# उल्हासनगर महानगरपालिका

## (अंतर्गत) लेखा परिक्षण अहवाल

## सन २०११–२०१२

# उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा परिक्षण अहवाल

# सन २०११–२०१२

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | विभागाचे नाव | आक्षेपांचे क्र. | पान नं. |
|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०१ ते १४ | १ ते ३१ |
| ०२ | पाणी पुरवठा विभाग | १५ ते १६ | ३२ ते ३६ |
| ०३ | वाहन विभाग | १७ ते १८ | ३७ ते ४१ |
| ०४ | मालमत्ता विभाग | १९ ते २१ | ४२ ते ४६ |
| ०५ | लेखा विभाग | २२ ते २४ | ४७ ते ४९ |
| ०६ | सार्वजनिक आरोग्य विभाग | २५ ते २७ | ४८ ते ५४ |
| ०७ | अतिक्रमण विभाग | २८ | ५५ |
| ०८ | कर विभाग | २९ ते ३४ | ५६ ते ६३ |
| ०९ | नागरिक सुविधा केंद्र | ३५ | ६४ |
| १० | जनसंपर्क विभाग | ३६ | ६५ ते ६६ |
| ११ | विदयुत विभाग | ३७ | ६७ |
| १२ | भांडार विभाग | ३८ ते ३९ | ६८ ते ७० |
| १३ | निवडणूक विभाग | ४० | ७१ ते ७२ |
| १४ | जकात विभाग | ४१ | ७३ ते ७४ |
| १५ | नगररचना विभाग | ४२ | ७५ |

# सन २०११—२०१२ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६(३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर नगरपालिका मुख्य लेखा परिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०११—२०१२ या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी सादर करीत आहे.

## प्रस्तावना :—

उल्हासनगर महानगरपालिका २१/१०/१९९६ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी लेखा परिक्षण महाराष्ट्र शासनाचे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे कडील मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा परिक्षण नवी, मुंबई या कार्यालयामार्फत केले जात होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखा परिक्षण महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षकामार्फत होत आहे. त्यानुसार जमा रकमांचे लेखापरिक्षण व खर्चाचे पूर्व लेखा परिक्षण केले जात आहे. पूर्व लेखा परिक्षणामुळे काम सुरू होण्यापूर्वीच अनियमितता निदर्शनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर थांबवता येतो.

उल्हासनगर पालिकेमध्ये मुख्य लेखा परिक्षक, सहा. मुख्य लेखा परिक्षक , तसेच १ वरिष्ठ लेखा परिक्षक आणि ३ लिपीक असा कर्मचारी वर्ग देण्यात आला आहे. यामधील २ लिपीक हे सतत तहसीलदार यांचे कार्यालयात BLO चे काम (मतदार याद्यांचे पूर्नविलोकन करणे.) करित असतात. १ लिपीक संगणक ऑपरेटरचे काम करतात. व १ लिपीक आवक जावकचे काम करतात. यामुळे लेखा परिक्षणाचे काम प्रभावीपणे पणे करता आले नाही. सामान्य प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी स्वरूपात अनुभवी कर्मचाऱ्याची नेमणूक करणेस कळवूनही पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. याबाबींचा परिणाम लेखा परिक्षणावर झालेला आहे. व यामुळे लेखापरिक्षण अहवाल विलंबाने सादर होत आहे.

प्राथमिक लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून, कार्यालयीन कामकाजामध्ये व लेख्यांमध्ये त्रुटी आढळतात त्या पुन्हा पुन्हा होऊ नये व कामामध्ये सुरळीतपणा, नियमितपणा तसेच मनपाच्या पैशाचा अपहार व गैरव्यवहार, गैरवापर टाळणे या उद्देशाने अंतर्गत लेखा परिक्षणात आढळून आलेल्या आक्षेपांचे बाबतीत संबंधीत विभाग प्रमुखांनी दखल घेऊन योग्य ती कार्यवाही त्वरीत करून अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

परिशिष्ट क्र. (१) स्थानिक निधी लेखा कार्यालयाच्या प्रलंबित लेखा परिक्षण परिच्छेदांची आद्यावत माहिती

| आरंभिचे एकूण परिच्छेद | एकूण वगळण्यात आलेले परिच्छेद | शिल्लक परिच्छेद |
|---|---|---|
| ७१४ | ०० | ७१४ |

परिशिष्ट क्र. (२) केंद्र सरकारच्या महालेखा परिक्षक कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालाबाबत.

महालेखापाल मुंबई यांचे कडून आपल्या महानगरपालिकेचे लेखा परिक्षण दर ३ वर्षांनी होत आहे.

| वर्ष | आरंभिची शिल्लक २०११—१२ पर्यत | महालेखा परिक्षक कार्यालयाने काढलेले परिच्छेदांची संख्या | निरिक्षण अहवालाची संख्या | अनुपालन मान्यते नंतर वगळण्यात आलेल्या परिच्छेदांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| २००३—०४ ते २०११—१२ | ८५ | ०० | ० | ०० | ८५ |

महालेखापाल, मुंबई कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन करण्याबाबत संबंधीत विभागांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार काही विभागांची अनुपालन सादर केलेले आहे. सदर अनुपालन महालेखापाल यांनी अद्याप मान्य केलेले नाही. त्यामुळे प्रलंबित आहेत.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.७ )

विषयः— निर्मल एम.एम.आर. योजनेंतर्गत केलेल्या कामाची प्रमाणके उपलब्ध न केल्याबाबत.

सन २०११—१२ मध्ये निर्मल एम.एम.आर(वस्ती स्वच्छतागृहाचे बांधकाम)या लेखा शिर्षात/ योजनेखाली खर्ची टाकलेली खालील प्रमाणके लेखापरिक्षणात उपलब्ध करून देण्यात आली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | १०१६ | ३/६/२०११ | १५९०१२ |
| ०२ | १११५ | ९/६/२०११ | २४३५४६ |
| ०३ | १११६ | ९/६/२०११ | ३०३७१५ |
| ०४ | २०३३ | ८/८/२०११ | ५९४३१ |
| ०५ | ३२०८ | १२/१०/२०११ | ५९००३ |
| ०६ | १७७० | २१/७/२०११ | ६२४९४३ |
| ०७ | १३३८ | २२/६/२०११ | ८०५८५ |
| ०८ | १६८७ | १६/७/२०११ | ५६७५९ |
| ०९ | २१३८ | १२/८/२०११ | ७८५२५ |
| १० | २१३८ | १२/८/२०११ | ५६६४८६ |
| ११ | २७१३ | १२/९/२०११ | २६७२५२ |
| १२ | २७९३ | १५/९/२०११ | ३८९१८ |
| १३ | ३२०८ | १२/१०/२०११ | ५९००३ |
| १४ | ३६९४ | १५/११/२०११ | २०६६९ |
| १५ | ३६९४ | १५/११/२०११ | २९५३ |
| १६ | ५२२३ | २१/०२/२०११ | २०५०४ |
| १७ | ५२२३ | २१/०२/२०११ | १२३८५८ |
| १८ | ५६५३ | २६/३/२०११ | १२९६० |
| १९ | ५६५३ | २६/३/२०११ | २१६० |
| | | एकुण | २७८०२८२ |

अनु.क्र. ९,१० आणि १४ ते १८ वर नमुद केलेली प्रमाणके एका कमांकाची ०२ वेळा मनपाने सादर केलल्या रोख पुस्तकाच्या

गोषवाऱ्यावरून दाखविण्यात आलेली आहे. सदरील प्रमाणके एकाच क्रमांकाची असली तरी वेंगवेगळया वजाती(deduction) प्रमाणे घेतलेली असल्याचें दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.2)

विषय:— खासदार निधीच्या खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध केली नसल्याबाबत

सन २०११—१२ या वित्तीय वर्षात खासदार निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून खर्च केलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणके तपासणीसाठी प्राप्त झाली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | मक्तेदाराचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | १८३१ | २६/७/११ | गिता मजूर सह. संस्था | २४९९५ |
| ०२ | १८३२ | २६/७/११ | पंचशिल सह.संस्था | १३३१०७ |
| ०३ | १८३३ | २६/७/११ | डहाणू रोड सह. संस्था | १२५२७ |
| ०४ | २२९४ | २६/८/११ | निळकंठ सह.संस्था | २४९९४ |
| ०५ | ३७३३ | १६/११/११ | मयूर सह.संस्था | ५०००० |
| ०६ | ४८१० | १७/१/१२ | राहूल सह.संस्था | २४८७९ |
| | | एकुण रक्कम | | १५०७१२ |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.3)

विषय:— दलितवस्ती सुधारणा खर्चाची प्रमाणके उपलब्ध करून न दिल्याबाबत.

दलितवस्ती योजनेअंतर्गत प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणके तपासणीसाठी उपलब्ध झालेली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्र | दिनांक | मक्तेदाराचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५३७ | ५/५/११ | जयंत मजूर का.स.सं. | ५४९९५ |
| ०२ | ५३८ | ५/५/११ | धिरज मजूर का.स.सं. | ४९७५० |
| ०३ | ५४३ | ५/५/११ | कलश मजूर का.स.सं. | १७४४५ |
| ०४ | ६२१ | १०/५/११ | मयूर मजूर का.स.सं. | २७५०० |
| ०५ | १९६३ | २/८/११ | पितांबर मजूर का.स.सं. | ४९७३४ |
| ०६ | १९६४ | २/८/११ | राजलक्ष्मी मजूर का.स.सं | २८५१२ |
| ०७ | २१०३ | १०/०८/११ | मोनाली मजूर का.स.सं. | २७५०० |
| ०८ | २१३४ | १२/०८/११ | जय मजूर का.स.सं. | ३५२५० |
| ०९ | २२८४ | २६/०८/११ | हरीहरेश्वर मजूर का.स.सं. | २७३६२ |
| १० | ३७४९ | १८/११/११ | महालक्षी का.स.सं. | ५०२५७ |
| ११ | ४१५८ | १५/१२/११ | हरे रामा मजूर का.स.सं. | ५४५१३ |
| १२ | ४३१९ | २१/१२/११ | जवाहर मजूर का.स.सं. | ५२१५७ |
| १३ | ४८११ | १७/१/१२ | मयूर मजूर का.स.सं. | २७५०० |
| १४ | ४८९३ | २०/१/१२ | प्रभा मजूर का.स.सं. | ४९७०८ |
| १५ | ४९४८ | २४/१/१२ | गरूराज मजूर का.स.सं. | ५०४५४ |
| १६ | ४९४९ | २४/१/१२ | कलश मजूर का.स.सं. | ५४९९४ |
| १७ | ५२४९ | २२/२/१२ | रविराज मजूर का.स.सं. | ४९७५० |
| | | | एकुण रक्कम | ७०७०८१ |

याशिवाय वाल्मिकी वसाहतींच्या संबंधात मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना अदा केलेली तीन देयके रक्कम रू.५२१२१७५/— ची प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.४)

**विषय:— राजिव गांधी नगरप्रभाग क्र.१० मध्ये नाला तयार करणे आणि दुरूस्ती करणे या कामात झालेले अतिप्रदान रू. ७२११४ आणि मोजमाप पुस्तकातील त्रृटींबाबत**

खासदार निधी अंतर्गत प्र.क्र.१० राजीव गांधी नगर येथे नाला तयार करणे व दुरूस्ती करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील त्रृटी आढळल्या

कामाचे नाव:— प्रभाग क्र. १० राजीव गांधी नगर येथे नाला तयार करणे व दुरूस्ती करणे.

कामाचे अंदाजपत्रक — रू. १००००००

मक्तेदाराचे नाव :— मे. शंकर महादेव मजूर कामगार सहकारी संस्था

तांत्रिक मंजूरी — ५९१८ दि. १३/०६/२०११

कार्यादेश क्र. — उमपा/साबावि/काअ/३३२९ दि.७/१०/२०११

मोजमाप पुस्तक क्र. ३४३८ पाने क्र. १ ते७

प्रमाणक क्र. ४७८९ दि. १६/०१/२०१२

करारनाम्याची तारीख — ७/१०/२०११

काम सुरू केल्याची तारीख — ७/१०/२०११

काम समाप्तीची तारीख — ०३/०१/२०१२

डी.डी.आर. — २९०२ दि. २२/०९/२०११

१) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजासाठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजांचा परिच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन २०११—१२ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामुग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.५०

टक्के प्रमाणे वसूली करणे आवश्यक होते. सबब, रू.५००० रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

२) खालील सामुग्रीचे दर २०१०—११ या वर्षाच्या दरसूची पेक्षा(महानगरपालिका क्षेत्रात ५टक्के) जादा घेवून सुध्दा अधिक घेतल्याचे दिसून आले त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र | सामग्रीचे नाव | डी.एस.आर. १०—११ चे दर अधिक ५% वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | खोदकाम नरम मुरूम/ओली माती | ९४.५० प्र.घ.मि. | ११६.५० प्र.घ.मि. | २२ | २४५.२८ | ५३९६ |
| ०२ | सिटु सिमेंट १:३:६ बेडिंग | ३२१३ प्र.घ.मि. | ३६४९ प्र.घ.मि. | ४३६ | ७०.०७ | ३०५५० |
| ०३ | सिटु सिमेंट एम—१० | ३२१३ प्र.घ.मि. | ३६८५ प्र.घ.मि. | ४७२ | ५७.४७ | २७१२५ |
| ०४ | एम—२० | ६८६७ प्र.घ.मि. | ७२२२ प्र.घ.मि. | ३५५ | ११.३९ | ४०४३ |
| | | | | | एकुण रक्कम रू. | ६७११४ |

वर दाखविल्या प्रमाणे सदर कामात मक्तेदारास रू.७२११४/— चे प्रदान झाल्याचे दिसून येते.

३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्र.१०:१:४ अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ठ अभियंता आणि त्यानंतर उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांना तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे.नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची

नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्यानंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे तारीखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र. ५)

विषय :— खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक ६४ मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकातून विलंब आकार, चाचणी अहवालाची रक्कम वसूल न केल्याने झालेली नुकसान रू. २५५४६/—

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक ६४ मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. कामाचे नावः— प्रभाग क्रमांक ६४ मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे.

२. कामाचे अंदाजपत्रक :— रू. ५९९२००/—

३. मक्तेदाराचे नाव :— मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था.

४. तांत्रिक मंजुरी :— ३१०५ दिनांक ०४/०८/२००९

५. कार्यादेश क्रमांक :— उमपा/साबांवि/काअ/१६५३ दिनांक २५/०१/२०१०

६. मोजमाप पुस्तक क्रमांक ३१६५ पाने १ते८

७. देयकाचा तपशील :— प्रमाणक क्रमांक ३६९८ दिनांक :— १५/११/२०११ :— रू. ५९९२००/—

८. करारनाम्याची तारीख :— ०४/०८/२००९

९. काम सुरू केल्याची तारीख :— ०४/०८/२००९

१०. समाप्तीची तारीख :— १८/०८/२०११

१. सन २०११—२०१२ या वर्षाच्या दरसुची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामुग्रीच्या चाचणी अहवालासाठी

०.५०% प्रमाणे वसूली करणे आवश्यक होते. सबब रू. २९९६/— रक्कम मक्तेदाराकडून वसूल केलेली नाही.

२. सदरील काम दिनांक २४/०७/२०१० रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. तथापी ते दिनांक १८/०८/२०११ रोजी पूर्ण झाल्याने ते ४५१ दिवस विलंबाने पूर्ण करण्यात आले. करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे प्रति दिवसाला रू. ५०/— याप्रमाणे रू. २२,५५०/— दंड वसूल करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने दिनांक ०२/०८/२०११ च्या पत्रान्वये विलंब आकार माफ करण्यासाठी म.न.पा.स विनंती केली.

३. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात प्रीकास्ट हेवी डयुटी इन इंटर लॉक पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश असून सदर बाबींचे जिल्हा दर सूचीमध्ये समावेश नसल्याचे दिसून आले. यासाठी तयार केलेल्या दर पृथक्ककरण संचीकेमध्ये तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही त्याचबरोबर २००८—२००९ च्या जिल्हा दर सूचीपेक्षा जादा दर अंदाजपत्रकात दाखविण्याचे दिसून आले. मात्र कामाच्या देयकासोबत दर पृथक्ककरण जोडलेले नसल्याने दराची तपासणी करता आली नाही.

४. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १८२ नुसार नमुना १३९ या विहीत प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

५. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्र. १०.०१.०४ अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगतीप्रमाणे कनिष्ठ अभियंता,उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेऊन त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत कालाने

तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्यानंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे तारखेनिशी नोंद घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

६. महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नियम क्र. १६७(२) नुसार मुळ अंदाजापेक्षा १० टक्के पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील, कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.६)

विषय :— कम्पाउंड भिंत तयार करणे या कामातील त्रुटी आणि त्यात झालेले अतिप्रदान रू. ९०६३४.

खासदार निधी अंतर्गत कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. कामाचे नाव:— कम्पाउंड भिंत तयार करणे.

२. कामाचे अंदाजपत्रक :— रू. ५९९२००/—

३. मक्तेदाराचे नाव :— मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था.

४. तांत्रिक मंजुरी :— ३१०५ दिनांक ०४/०८/२००९

५. कार्यादेश क्रमांक :— उमपा/साबांवि/काअ/१६५३ दिनांक २१—१२२००

६. मोजमाप पुस्तक क्रमांक ३१६५ पाने १ते८

७. करारनाम्याची तारीख :— ०४/०८/२००९

८. काम सुरू केल्याची तारीख :— ०४/०८/२००९

९. काम समाप्तीची तारीख :— १८/०८/२०११

१०. देयकाचा तपशील :— प्रमानक क्रमांक ४३२५ दिनांक २२/१२/२०११ रू. ५९९२००

१. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजासाठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परिच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. २०११—२०१२ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.५० टक्के प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. परंतु रू. २९९६रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

२. सदरील कामाचा करारनामा दि. ०४/०८/२००९ रोजी करण्यात आलेला असुन त्यातील अटिप्रमाणे सदर काम दि. १/१२/२००९ रोजी पुर्ण करणे आवश्यक होते. मात्र

ते दि. १८/०८/२०११ रोजी पूर्ण झाले. म्हणजेच या कामात एकूण ६२५ दिवस विलंब झालेला आहे. मात्र त्या पोटी दंडाची रक्कम रू. ३१२५० मक्तेदाराच्या देयकातून वसूल करण्यात आलेली नाही. करारनामा दि. ०४/०८/२००९ रोजी झालेला असताना मक्तेदाराने दि. २/८/२०११ च्या पत्राने विलंब माफ करण्याबांबत विनंती केल्याचे आणि त्याप्रमाणे म.न.पा.ने विलंब माफ केल्याचे दिसून आले. पाणीपुरवठाच्या जोडण्या टाकावयाच्या होत्या आणि काही सामग्रीचे दर वाढलेले होते. की त्यांनी दिलेली कारणे समर्थनिय दिसून येत नाहीत. कामाचे आदेश देण्यापुर्वी या सर्व बाबीचा विचार होणे आवश्यक होते सबब मक्तेदाराकडून रू. ३१२५०/— ची वसुली होणे आवश्यक आहे.

३ खालील सामग्रीचे दर २०१०—२०११ या वर्षाच्या दर सुचीपेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात ५टक्के जादा घेऊन सुध्दा) जादा घेतल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामाचे दर पृथकरण लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही. त्यामुळे सदर कामाच्या प्रत्येक बाबीच्या लिड बाबत माहिती प्राप्त झाली नाही.

| अ. क्र. | सामग्रीचे नाव | डि.एस.आर २०१०—२०११ चे दर+५ टक्के वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिटू सिमेंट १:३:६ | २९२८ प्र.घ.मी. | ३३९७ प्र.घ.मी. | ४६९ | ९.१६५ | ४२९६ |
| २ | एम—१५ | ३७४४.३०प्र.घ.मी. | ४१४३.५० प्र.घ.मी. | ३९९.२० | ६०.७२ | २४२३९ |
| ३ | वाळू प्लास्टर | २१५.२५ चौ.फु. | २७४.९० चौ.फुट | ५९.६५ | ४६६.९५ | २७८५३ |
| | | | | एकूण | | ५६३८८ |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास रू. ९०६३४ चे जादा प्रदान झाले आहे. सदर रकमेची वसूली होणे आवश्यक आहे.

४. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम क्र. १८२ नुसार नमुना १३९ या विहीत प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

५. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्र. १०:०१:०४ अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगतीप्रमाणे प्रथम कनिष्ठ अभियंता त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारेखेनिशी घेऊन त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रदान

करणे आवश्यक आहे. तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क.७)

विषय :— प्रभाग क ६४ मध्ये आंबेडकर उदयानात विकास कामात झालेले अतिप्रदान रू.११२९१६/—

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क.६४ मधील आंबेडकर उदयान मध्ये विकासकामे करण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव क.प्रभाग क :— ६४ मधील आंबेडकर उदयान मध्ये विकासकाम करणे.
कामाचे अंदाजपत्रक :— रू. १००००००/—
मक्तेदाराचे नाव :— संस्था सहकारी कामगार मयूर मे.
तांत्रिक मंजुरी :— ३१०४ दिनांक ०४/०८/२००९
कार्यादेश क्रमांक/का/साबांवि/उमपा:— १६५५ दि. २५/०१/२०१०
मोजमाप पुस्तक क्रमांक ३१६८
देयकाचा तपशील प्रमाणक कमांक:—४३२३ दिनांक २२/१२/२०११ रू.१००००००/—
करारनाम्याची तारीख :— ०४/०८/२००९
काम सुरू केल्याची तारीख :— ०४/०८/२००९
समाप्तीची तारीख :— २६/०९/२०११

१. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराने स्वामित्वधन रक्कम भरणा केल्याची खात्री न करताच प्रदान केले आहे. सन २०११—२०१२ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.५०टक्के प्रमाणे वसूली करणे आवश्यक होते. परंतु रू.५०००/— रक्कम मक्तेदाराच्या देयकातून वसुल करण्यात आलेली नाही.

२. सदरील काम दिनांक २३/०७/२०१० रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. तथापि ते दिनांक २६/०९/२०११ रोजी पूर्ण झाल्याने ते ४३० दिवस विलंबाने पूर्ण करण्यात आले. करार नाम्यातील अटि व शर्तीप्रमाणे प्रति दिवसाला रू. ५० या प्रमाणे रू. २१५००/— दंड वसूल करणे आवश्यक होते. मक्तेदाराने दि. २/८/२०११ च्या पत्रान्वये म.न.पा.स विलंब माफ करण्याची विनंती केली. कार्यादेश दि. २५/०१/२०१० चे असताना प्रत्येक

कामाची सुरूवात त्याप्रमाणे न करता दि. ०२/०८/२०११ च्या पत्राने कळविले कि, पाण्याच्या वाहिन्या टाकण्याचे काम सुरू होते. आणि अत्यावश्यक त्या सामुग्रीचे दर वाढले होते. हि कारणे योग्य व संयुक्तीक नाही.

३. सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथकरण दिलेले नसल्याने अंदाजपत्रकातील दराची तपासणी करता आली नाही. तथापी जिल्हा दर सुचीतील दरापेक्षा (म.न.पा. साठीचे ५टक्के अधिक दर विचारात घेऊन सुध्दा) खालीलप्रमाणे अधिक रक्कम अंदाजपत्रकात दाखवून मक्तेदारास जादा प्रदान केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डि.एस.आर २००८—०९ चे दर+५टक्के वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी.सी.सी. १:३:६ बेडिंग पाया | २९२८ प्रति घ.मी. | ३३९७ प्रति घ.मी. | ४६९ प्रति घ.मी. | ३६.७३ | |
| २ | पी.सी.सी. एम—१५ | ३४६४ प्रति घ.मी. | ४१४३.५० प्रति घ.मी. | ६७९.५० प्रति घ.मी. | ९०.३९ | |
| ३ | वाळू प्लास्टर | २४३ प्रति घ. मी. | २७४.९० प्रति घ.मी. | ३१.९० प्रति घ.मी. | २१०.३७ | |
| ४ | सिमेंट प्लास्टर | ६६.१५ प्रति घ.मी. | ९१.३९ प्रति घ.मी. | २५.२४ प्रति घ.मी. | ४२.०१ | |
| | | | | | एकूण | ८६४१६ |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रू. ११२९१६ जादा अदा झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसुली संबंधीत मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

४. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम क्र. १८२ नुसार नमुना १३९ या विहीत प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

५. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्र. १०:०१:०४ अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगतीप्रमाणे प्रथम कनिष्ठ अभियंता त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारेखेनिशी घेऊन

त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र. ८)

**विषय:—** प्रभाग क्र. ६४ मध्ये पेवरब्लॉक टाकणे या कामातील अतिप्रदाना बाबत.

दलितवस्ती सुधारणा अंतर्गत प्र.क्र.६४ मध्ये पेवरब्लॉक टाकणे या कामाच्या देयकाचे तपासणी केली असता खालील त्रृटी आढळल्या.

कामाचे नाव:— प्रभाग क्र. ६४ मध्ये पेवरब्लॉक टाकणे

कामाचे अंदाजपत्रक — रू. ९९९८००

मक्तेदाराचे नाव :— मे. मोनाली कामगार सहकारी संस्था

तांत्रिक मंजूरी — ३६७५ दि. १७/३/२०१०

कार्यादेश क्र. — उमपा/साबावि/काअ/२२८२ दि.६/०९/२०१०

मोजमाप पुस्तक क्र. २०१८

देयकाचा तपशील — प्रमाणक क्र. १०१२ दि. ३/६/२०११ रू. ९९९८००

करारनाम्याची तारीख — ६/९/२०१०

काम सुरू केल्याची तारीख — ६/९/२०१०

काम समाप्तीची तारीख — १४/१२/२०१०

डी.डी.आर. — २३५७ दि. २६/०८/२०१०

१) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजासाठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. दलितवस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजांचा परिच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला नाही. २०११—१२ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामुग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.५०%

प्रमाणे वसूली करणे आवश्यक होते. सबब, ४९९९ रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

२) सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथ:करण दिलेले नसल्याने त्याची तपासणी करता आली नाही. सन २००८—०९ च्या जिल्हा दरसूचीतील दरापेक्षा(५% अधिक दर घेवून सुध्दा) खाली दर्शविल्याप्रमाणे अधिक रक्कम मक्तदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ. क्र | सामग्रीचे नाव | डी.एस.आर. ०८—०९चे दर ५% अधिक वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमार्ण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पी.सी.सी १:३:६बेडींग पाया | २९२८ प्र. घ.मि. | ३३९७ प्र.घ. मि. | ४६९ | १०५. १२ | ४९३०१ |
| ०२ | डब्ल्यू बीएम ७५/१०० | ६८२ प्र.घ. मि. | ७९४ प्र.घ. मि. | ११२ | ९९. ३६ | १११२८ |
| एकुण रक्कम रू. ६०४२९/— | | | | | | |

वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रू.६५४२८ ज्यादा अदा झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसूल संबंधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

३) सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम क्र. १८२ नुसार नमुना १३९ या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

४) महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नियम क्र. १६७(२) नुसार मुळ अंदाजपेक्षा १०% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरण पत्रात अंदाजपत्रकातील बाब क्र.१ व ९ मध्ये अंदाजपत्रकातील

प्रस्तावित आणि प्रत्यक्ष केलेले काम यातील तफावत ४४% ज्यादा दिसून आली. सदर फरकाचे कोणतेही स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.९)

विषय:— निर्मल एम.एम.आर. योजनेंतर्गत केलेल्या कामाची प्रमाणके उपलब्ध न केल्याबाबत.

सन २०११—१२ मध्ये निर्मल एम.एम.आर(वस्ती स्वच्छतागृहाचे बांधकाम)या लेखा शिर्षात/ योजनेखाली खर्ची टाकलेली खालील प्रमाणके लेखापरिक्षणात उपलब्ध करून देण्यात आली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | १०१६ | ३/६/२०११ | १५९०१२ |
| ०२ | १११५ | ९/६/२०११ | २४३५४६ |
| ०३ | १११६ | ९/६/२०११ | ३०३७१५ |
| ०४ | २०३३ | ८/८/२०११ | ५९४३१ |
| ०५ | ३२०८ | १२/१०/२०११ | ५९००३ |
| ०६ | १७७० | २१/७/२०११ | ६२४९४३ |
| ०७ | १३३८ | २२/६/२०११ | ८०५८५ |
| ०८ | १६८७ | १६/७/२०११ | ५६७५९ |
| ०९ | २१३८ | १२/८/२०११ | ७८५२५ |
| १० | २१३८ | १२/८/२०११ | ५६६४८६ |
| ११ | २७१३ | १२/९/२०११ | २६७२५२ |
| १२ | २७९३ | १५/९/२०११ | ३८९१८ |
| १३ | ३२०८ | १२/१०/२०११ | ५९००३ |
| १४ | ३६९४ | १५/११/२०११ | २०६६९ |
| १५ | ३६९४ | १५/११/२०११ | २९५३ |
| १६ | ५२२३ | २१/०२/२०११ | २०५०४ |
| १७ | ५२२३ | २१/०२/२०११ | १२३८५८ |
| १८ | ५६५३ | २६/३/२०११ | १२९६० |
| १९ | ५६५३ | २६/३/२०११ | २१६० |
| | | एकुण | २७८०२८२ |

अनु.क्र. ९,१० आणि १४ ते १८ वर नमुद केलेली प्रमाणके एका क्रमांकाची ०२ वेळा मनपाने सादर केलल्या रोख पुस्तकाच्या

गोषवाऱ्यावरून दाखविण्यात आलेली आहे. सदरील प्रमाणके एकाच क्रमांकाची असली तरी वेगवेगळया वजाती(deduction) प्रमाणे घेतलेली असल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद ७.१०)

विषयः— मजुर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आलेल्या कामातील अनियमितता.

शासन निर्णय क्र. सीएटी०१/०५/प्र.क्र. २६/ इमारती २ दिनांक ३१/०५/२००५ अन्वये १५ लाखापर्यतची कामे नोंदणीकृत कंत्राटदार, बेरोजगार, अभियंता तसेच मजुर सहकारी संस्था यांना खालीलप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे.

अ) पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार—३४ टक्के

ब) सुशिक्षित बेरोजगार अभियंता —३३ टक्के

क) मजुर सहकारी संस्था— ३३ टक्के

तसेच रू. १५,००,०००/— वरिल कामे कंत्राटदार आणि बेरोजगार अभियंता यांना अनुक्रमे ६६ टक्के, ३४ टक्के या प्रमाणे देणे आवश्यक आहे. मात्र उल्हासनगर महानगरपालिकेने रू. १५,००,०००/— पर्यतची सर्व कामे मजुर सहाकरी संस्थेकडून घेण्यात आल्याने इतर घटकांना कामाचे वाटप करण्यात आलेले नाही. सबब शासनाच्या निर्णयाचे सरळ सरळ उल्लंघन केलेले दिसून येते. तसेच निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ उल्हासनगर महानगरपालिकेस झालेला नाही. याबाबत योग्य तो खुलासा लेखा परिक्षणास करण्यात आलेला नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.११)

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक ६४ मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निर्दशनास आली आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. कामाचे नाव:— प्रभाग क्रमांक ६४ मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे.

२. कामाचे अंदाजपत्रक :— रू. ५९९२००/—

३. मक्तेदाराचे नाव :— मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था.

४. तांत्रिक मंजुरी :— ३१०५ दिनांक ०४/०८/२००९

५. कार्यादेश क्रमांक :— उमपा/साबावि/काअ/१६५३ दिनांक २५/०१/२०१०

६. मोजमाप पुस्तक क्रमांक ३१६५ पाने १ते८

७. देयकाचा तपशील :— प्रमानक क्रमांक ३६९८ दिनांक :— १५/११/२०११ :— रू. ५९९२००/—

८. करारनाम्याची तारीख :— ०४/०८/२००९

९. काम सुरू केल्याची तारीख :— ०४/०८/२००९

१०. समाप्तीची तारीख :— १८/०८/२०११

१. महसूल आणि वन विभागाच्या दिनांक १५/१२/२००६ च अधिसूचनेनुसार दिनांक १५/०२/२००६ नंतरच्या कार्यादेश वर रू. ३५.३४ /— प्रति घनमीटर याप्रमाणे रॉयलटी मक्तेदाराच्या देयकातून वसुल करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी ५१२.२७२ घन मीटर वाळू, नरम मुरूम, रबल, इत्यादी गौण खनिज सामग्रीचा वापर केल्याने त्यावर मक्तेदाराकडून रू. १८,१०३/— वसूल करणे आवश्यक

होते. किंवा सदर रक्कम त्याने राज्य शासनाकडे ०८५३ गौण खनिज या लेखा शिर्षाखाली जमा केल्याचे चलन प्राप्त करणे आवश्यक होते. मात्र या प्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

२. सन २०११–२०१२ या वर्षाच्या डि.एस.आर. प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामुग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.५०% प्रमाणे वसूली करणे आवश्यक होते. सबब २९९६/– रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

३. सदरील काम दिनांक २४/०७/२०१० रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. तथापी ते दिनांक १८/०८/२०११ रोजी पूर्ण झाल्याने ते ४५१ दिवस विलंबाने पूर्ण केल्याने करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे प्रति दिवसाला रू. ५०/– याप्रमाणे रू. २२,५५०/– दंड वसूल करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने दिनांक ०२/०८/२०११ च्या पत्रान्वये म.न.पा.स विनंती केल्याने ती माफ करणे योग्य व संयुक्तीक नाही.

४. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात प्रीकास्ट हेवी डयुटी इन इंटर लॉक पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश असून सदर बाबींचे जिल्हा दर सूचीमध्ये समावेश नसल्याचे दिसून आले. यासाठी तयार केलेल्या दर पृथक्ककरण चा समावेश सदर कामाच्या संचिकेत दिसून आला नाही. त्यामुळे सदर बाबींचे दर कसे निश्चित केले याची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्याचबरोबर २००८–२००९ च्या जिल्हा दर सूचिच्या दरापेक्षा ज्यादा दर अंदाजपत्रकात नमुद केल्याने मक्तेदारास ज्यादा प्रदान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कामाच्या

देयकासोबत दर पृथक्ककरण जोडलेले नसल्याने दराची तपासणी करता आली नाही.

५. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १८२ नुसार १३९ या विहीत प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

६. मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ठ अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेऊन त्यानंतरच पाहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र. १२)

विषयः— निर्मल एम.एम.आर. अभियानाअंतर्गत (वस्ती स्वच्छता गृह) कामाच्या करारनाम्यामध्ये कमी मुद्रांक घेतल्याबाबत.

निर्मल एम.एम.आर. अभियानाअंतर्गत टप्पा क्र. १ खाली ८२ टॉयलेट ब्लॉक एकूण १४०२ सिटस शौचालये बांधण्याची कामे मे. स्पार्क, जनसेवा युवक प्रतिष्ठान या तीन अशासकीय संस्थाना (NGO) देण्यात आली होती. तसेच टप्पा क. २ खाली ८१ टॉयलेट ब्लॉक १२.३१ सिटस बांधण्याची कामे १३ संस्थाना देण्यात आली होती. सदरील अशासकिय तसेच स्थानिक मक्तेदारांना कार्यादेश देण्यापूर्वी त्यांना दिलेल्या कामांचे करारनामे १०० च्या मुद्रांकावर केल्याचे दिसून आले. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५७ कलम ६३ अनुसार प्रत्येक कामाचा करारनामा रू. १०,००,०००/— पर्यत रू.१०० या मुद्रांकावर आणि त्यापुढे प्रत्येक रू.१,००,०००/— साठी रू. १०० मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. निर्मल एम.एम.आर. योजनेखाली खालील प्रपत्रात दाखविण्यात आल्या प्रमाणे कमी मुद्रांक घेतल्याचे दिसून येते.

| अ. क्र. | मक्तेदाराचे नाव | कार्यकरार रक्कम | आवश्यक मुद्रांक | प्रत्येक्षात लावलेले मुद्रांक | कमी रकमेचे मुद्रांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. स्पार्क | १०८७५६७८२ | १०७८५६ | १०० | १०७७५६ |
| २ | मे. जनसेवा | ५१९३७२२९ | ५१०३७ | १०० | ५०९३७ |
| ३ | मे. युवक प्रतिष्ठान | ४०५०६६०५ | ३९६०६ | १०० | ३९५०६ |
| ४ | मे. जनसेवा | ६५६६१८९२ | ६४७६१ | १०० | ६४६६१ |
| ५ | मे. जागरूक म.म. | १०२६५७८४३ | १०१७५८ | १०० | १०१६५८ |
| ६ | मे. साईनाथ सेवा | २४७२७१६ | १५७२ | १०० | १४७२ |
| ७ | मे. तेजस्विनी महिला मंडळ | ३२८४४२८ | २३८४ | १०० | २२८४ |
| ८ | मे. सावली ठाणे | ४१०३३४० | ३२०३ | १०० | ३१०३ |
| ९ | मे. लोकसेवा वेलफेअर | ४४२२५००३ | ३५२५ | १०० | ३४२५ |
| १० | मे. सप्रेम | ३५९११७६ | २६९१ | १०० | २५९१ |
| ११ | मे.सिंधूदुर्ग | १२२९३६४ | ३२९ | १०० | २२९ |
| १२ | मे.युनिटी सोशल | २३९८४१२ | १४९८ | १०० | १३९८ |
| १३ | मे. जय दुर्गा | ३९४६७४३ | ३०४६ | १०० | २९४६ |
| १४ | मे. प्रज्ञाज्योती म.म | २३८३६९२ | १४८३ | १०० | १३८३ |
| १५ | मे. आकांक्षा सा.प्र | २०३४७५० | ११३४ | १०० | १०३४ |
| १६ | मे. मंगलसाई सा.स | १७९४९९४ | ८९४ | १०० | ७९४ |
| | | | एकूण रक्कम | | ३८५१७७ |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे रू. ३,८५,१७७/— चे मुद्रांक कमी स्विकारण्यात आल्याने त्याची वसुली संबंधित मक्तेदाराकडून करणे आवश्यक आहे. ती न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र. १३)

विषय:— १५ लाखापर्यंतची कामे शासननिर्णयानुसार ३३:३३:३४ या गुणोत्तर प्रमाणात वाटप झाली नसलेबाबत.

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष २०११—१२ या कालावधीतील लेख्यांचे लेखा परिक्षण करताना खालील बाब निर्दशनास आली. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०११—१२ या वित्तीय वर्षात कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील — शासन निर्णय क्रमांक सीएटी—०७/०६/प्र.क्र.९४/इमा—२/दिनांक १६/११/२००६ अन्वये रू. १५ लाखापर्यंत कामाचे वाटप सहकारी मजुर कामगार संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात करावयाचे आहे.

तरी आपल्या विभागामार्फत वित्तीय वर्ष २०११—१२ मध्ये करण्यात आलेली बरीचशी कामे हि मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र. १४)

# सार्वजनिक बांधकाम विभाग

## राजीव गांधी आवास योजना

उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०११–२०१२ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण राजीव गांधी आवास योजनाच्या रोख पुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) राष्ट्रीय नगरपालिका लेखांश परिच्छेद क्रमांक ५.३ अन्वये योजनेची रोख पुस्तके विहीत प्रपत्रात ठेवण्यात आलेली नाहीत. दैनंदिन नोंदी आणि मासिक गोषवारे संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीत केलेले नाहीत.

२) सन २०११–१२ मध्ये सदर योजनेखाली खर्च निरंक आहे. आरंभिची शिल्लक रूपये ३६०३२०९/– असल्याचे रोख पुस्तकावरून दिसून आले संपूर्ण वर्षभरात सदरील योजनेखाली कोणताही खर्च झालेला नसताना आणि तो होण्याची शक्यता नसतांना सदरील रक्कम जादा व्याजाच्या दराने अल्पमुदतीसाठी गुंतविणे आवश्यक होते. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने महानगरपालिकेस कमी व्याज प्राप्त झाले.

३) सन २०११–१२ मध्ये सदर योजनेखाली कोणतेही काम न करण्याचे काय प्रयोजन होते ? याची माहिती लेखा परिक्षणास सादर करावी.

४) शिल्लक रक्कम रूपये ३७,४७,५७०/– शासनास परत का करण्यात आली नाही ?

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद ३.१५)

विषय:— जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७ अन्वये आकारण्यात आलेल्या उपकर थकबाकीबाबत माहीती उपलब्ध करून देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष २०११—१२ या कालावधीतील लेख्यांचे लेखापरीक्षण करताना खालील त्रुटी आढळून आल्या. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल—मल नि:सारण विभागामार्फत जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,१९७७ अन्वये आकारण्यात आलेल्या उपकरापोटी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे रक्कम वित्तीय वर्ष २०११—१२ मध्ये अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | धनादेश क्रमांक | अदा केलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | ६४७ | १३.०५.२०११ | ८१५७४० | २६९६५३० |
| २ | ४४०२ | २६.१२.२०११ | ८६८८२५ | १२२७६० |
| ३ | ४४०३ | २६.१२.२०११ | ८६८८२४ | २०१० |
| ४ | ४४९० | ३०.१२.२०११ | ८५६४३६ | ३८८००० |
| | | | एकूण | ३२०९३०० |

अ) जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ मधील कलम ३३ ए अन्वये महानगरपालिकेकडून वापरण्यात आलेल्या पाण्यावर (सांडपाण्यावर) उपकर आकारणेची तरतूद आहे.

ब) उपकराची रक्कम विहीत कालावधीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास अदा न केल्यास जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७ मधील कलम १०

अन्वये प्रति महिना २% प्रमाणे दंड आकारण्याची तरतूद आहे.

क) त्याचप्रमाणे कलम ७ अन्वये सांडपाण्यावर योग्य प्रमाणात जलशुध्दीकरण केंद्रामार्फत शुध्दीकरणाची प्रक्रिया करण्यात आल्यास देय रकमेवर २५ % (रिबेट) सुट देणेबाबत तरतूद करण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून उपकराची रक्कम सन १९९४ पासून अदा न केल्याने सन १९९४ पासून ते माहे ३/२०१२ पर्यंत एकूण रू. ३९,४९,४९९/— इतकी उपकराची रक्कम व विहीत मुदतीत रक्कम अदा न केल्याने विलंबापोटी रू. ७,६८,०५३/— इतकी आकारणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
**उल्हासनगर महानगरपालिका**

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद ३.७६)

विषय:— महाराष्ट्र औद्‌योगिक विकास मंडळ यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या पाणी देयकाबाबत.

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष २०११—२०१२ या कालावधीतील लेख्यांचे लेखापरिक्षण केले असता उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचे पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहीनीवरून देण्यात आलेल्या विविध नळ, जोडण्याद्‌वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. माहे सप्टेंबर २०११ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचेकडून पाणी पुरवठा करण्यात आल्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक | धनादेश क्रमांक | कंत्राटदाराचे नाव | निव्वळ अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३०७९ | ८४७६२८ | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ | ५००००००/— |
| २ | ३०८० | ८४८२१२ | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ | २५००००००/— |
| | | | एकूण | २५५०००००० |

उपरोक्त प्रदानाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती/लेखे लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले नाही.

**A)** महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचे पत्र क्र. काअ/स्वीस ४/६४३०/सन २०११ दि. १९/०९/२०११ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकडे माहे ऑगस्ट २०११ अखेर खालीलप्रमाणे पाणी पुरवठा देयक थकबाकी असल्याचे नमूद आहे.

अ) निव्वल पाणी पुरवठा देयक
थकबाकी रू.८६५२.२४७/— लक्ष

आ) मीटर नादुरूस्तीचा दंडनिय आकार रू.२००.७०४/— लक्ष

इ) मंजूर कोटयापेक्षा जास्त पाणी
वापरावरील दंडात्मक आकार रू. १३५२.३१०/— लक्ष

ई) विलंब आकार रू.८७६२.४३२/— लक्ष

एकूण रू. १८९९७.६९४/— लक्ष

**B)** डिसेंबर १९९४ ते जून २००२ पर्यत खालीलप्रमाणे थकबाकी होती.

अ) निव्वळ पाणी पुरवठा देयक थकबाकी रू.३४००.९४/—लक्ष

आ) विलंब आकार रू.३६८०.८०/—लक्ष

**एकूण रू.७०८१.७४/— लक्ष**

१) उपरोक्त (A) च्या अनुषंगाने प्रमाणक क्र. ३०८० अन्वये रू. २५००००००/— इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तरी (A) च्या अनुषंगाने म.औ.वि.मंडळास अद्याप पर्यत प्रदान करण्यात आलेली रक्कम, शिल्लक रक्कम, इ.बाबतचा तपशिल सक्षम प्राधिकाऱ्याच्या साक्षांकित प्रतीसह सादर करावा. त्याचप्रमाणे थकबाकीमागील कारणमिमांसा सादर करावी.

२) उपरोक्त (B) च्या अनुषंगाने प्रमाणक क्र. ३०७९ अन्वये रू. ५०००००/— इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तरी (B) च्या अनुषंगाने म.औ.वि.मंडळास अद्याप पर्यत प्रदान करण्यात आलेली रक्कम, शिल्लक रक्कम, इ.बाबतचा तपशिल सक्षम प्राधिकाऱ्याच्या साक्षांकित प्रतीसह सादर करावा. त्याचप्रमाणे थकबाकीमागील कारणमिमांसा सादर करावी.

निव्वळ पाणी पुरवठा देयकाची थकबाकी रक्कम रू. ३४००.९४ लक्ष अदा करणेकरीता १० वर्षाचा परतफेडीचा आराखडा मंजूर केला होता. ज्यामुळे विलंब आकाराची रक्कम रू. ३६८०.८० लक्ष इतकी रक्कम माफ करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर योजनेचा फायदा घेतला किंवा कसे? याबाबत साधार अनुपालन करावे.

३) मा. आयुक्त, उमपा यांचे कार्यालयीन आदेश क्र. उमपा/आका/५८१ दि. ३०.१२.२०११ अन्वये MIDC व उ.म.पा. यांचेमध्ये पाणी खरेदीच्या अनुषंगाने प्रलंबित रकमेच्या तफावतीबाबत परीमाणावर व रक्कमेवर एकमत होणे आवश्यक असल्याने श्री. एम.

जी.गिरगांवकर, कार्य.अभियंता(पापु) यांच्या अध्यक्षतेखाली गट तयार करण्यात आला होता. सदर गटाने ३० दिवसात अलवाल सादर करणे आवश्यक होते तरी सदर अहवालाची साक्षांकित प्रत लेखा परिक्षणास देण्यात आली नाही.

४) पाणी पुरवठा विभागाचे खरेदी—खर्च व इतर बाबींचे त्रयस्थ् संस्थेमार्फत लेखा परिक्षण करण्यात आले किंवा कसे ?

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# वाहन विभाग

विषय :– वाहन खरेदीमधील अनियमिततेबाबत.....

(परिच्छेद क्र. १७)

उल्हासनगर महापालिकेच्या वाहन विभागामार्फत वित्तीय वर्ष २०११–१२ मध्ये लेखाशिर्ष ।।.२ च्तंज.द्यद्य मधून खालीलप्रमाणेवाहन खरेदी कर विभागाने नमुना –१ मध्ये पावती पुस्तक नोंदवही ठेवली असुन त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहे केली आहते.

सन. २०११–२०१२ च्या पावती पुस्तक लेख्याची पडताळणी केली असता, भांडार विभागाने कर संकलन विभागास खालील प्रमाणे पावती पुस्तके वितरीत केली आहेत.

| अ. क्र | प्रमाणक क्रमांक व दिनांक | पुरवठादाराचे नांव | वहनाचा प्रकार | वहनाचा दर रू. | एकूण वाहने | बिलाची केलेलेरक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५६२६/२१.३.१२ | मेहन मोटर्स | ट्रॅक्टर ट्रॉली,टॅक | ३९९०००, | ०४ | १५३२१२६ |
| २ | ८३/७.०४.२०११ | टाटा मोटर्स | मिनी बस | १२२८१८ | ०१ | ११२२८१८ |
| ३ | ४५६२/२.०१.२०११ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी | जीप बोलेरो | ४९७५३४ | ०२ | ९९५०६९ |
| | | ... | | | | ३६५००१३ |

वरील वाहन खरेदीच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळून आल्या आहेत.

१. नगरविकास विभाग शासन निणर्य क्रं.संकीर्ण–२००७/वाहन खरेदी/प्र.क्रं. २७/२००८नवि–२६,दिनांक २८/०२/२००८ अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.२७ जून २००७ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे काटकसरीचे धोरणाची उपाययोजना म्हणून तसेच उपलब्ध निधीचा जास्त व सुयोग्य वापर होण्यासाठी शासन निणर्यातील परिच्छेद ३ नुसार नवीन वाहन खरेदी करतांना बदली नवीन वाहन घेण्यापूर्वी जुने वाहन निकाली काढावे व तसा उल्लेख नवीन वाहन खरेदी आदेशात करण्यात यावा, असे असतांना मनपाकडील जुन जीप वाहन क्रमांक MH-05F229, MH-05F170 तसेच जुनी मिनी बस निकाली काढण्याबाबत कार्यवाही न करता वाहन ब केली आहे.

मनपा आरोग्य विभागाने स्प्रेईगकरीता चार टॅक्टर खरेदी प्रस्तावित करून खरेदीसाठी निविदा मागविण्यात
आल्या, त्यामध्ये खालील निविदा प्राप्त झाल्याचे दिसून येते.

१. मे. मेहन मोटर्स कं.बुलढाणा
२. मे. पॉजीटिव्ह ट्रॅक्टरर्स, नाशिक
३. मे. नवार ट्रॅक्टरर्स, अहमदनगर

वरील ट्रॅक्टर खरेदी निविदा नस्तीचे अवलोकन केले असता खालील बाबी निर्दशनास आल्या आहेत.

वरील निविदा धारक हे ट्रॅक्टरचे अधिकृत विक्रते असल्याचे प्राधिकारपत्र पुरवठा धारकाचे व्यवसाय प्रमाणपत्र आयकर भरल्याबाबतचे वितरणपत्र तसेच व्हॅट प्रमाणपत्राच्या प्रती, निविदा नस्ती सोबत आढळून आल्या नाही.

२. स्थायी समितीच्या दिनांक २८/४/२०११ चे मंजरीनुसार पुरवठा आदेश क्र. c/vehicle/06 दिनांक ९/६/२०११ नुसार मोहन मार्टर्स कंपनी यांचे वाटाघाटी अंती कमी असलेल्या दराप्रमाणे चार ट्रॅक्टरर्स, ट्रालीसह प्रती ट्रॅक्टर रु. ५०४०००/– प्रमाणे आदेश देण्यात आले त्यानुसार मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी दि. २०/८/२०११ रोजी सुचवल्यानुसार २५ एच् पी ट्रॅक्टरर्स, ऐवजी पंधरा एच् पी ट्रॅक्टरर्स, खरेदी करण्याचे ठरविण्यात आले व त्यासाठी महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा कंपनीचे दरपत्रकावरुन सदरचे पुरवठादार ट्रॅक्टरर्स, पुरविण्याबाबत मे. मोहन मोटर्स मलकापुर जिल्हा बुलढाणा यांना पुरवठा आदेश क्र. १५३ दिनांक २८/९/२०११ पुरवठा करणेबाबत कळविण्या आले महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा कंपनीने दिलेले पंधरा एच् पी ट्रॅक्टरचे दर रु. २३००००/– व मोहन मोटर्स मलकापुर जिल्हा बुलढाणा यांचे पंधरा एच् पी ट्रॅक्टरचे दर रु ३९९०००/– या दोन्ही दरांमध्ये तुलना केली असता मोहन मोटर्स मलकापुर जिल्हा बुलढाणा यांचे दर महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा कंपनीचे दरापेक्षा प्रती ट्रॅक्टर दर रु. १६९००००/– ने जास्त असल्याचे दिसुन आले. स्थायी समितीच्या दि. २८/४/२०११ चे मंजुरीनुसार २५ एच् पी ट्रॅक्टरर्स खरेदीस मंजुरी असतांना पंधरा एच् पी ट्रॅक्टरर्स खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यामुळे एकूण ट्रॅक्टर खरेदीपोटी रु. ६७६०००/– इतक्या रक्कमेचे जादा प्रदान झाल्याचे दिसुन येते.

३. सदरचे चार ट्रॅक्टर ट्रॉली प्राप्त झाल्याची पुरवठादाराकडील डिलेव्हरी चलन लेखा परिक्षणासाठा प्राप्त झाले नाही..

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

...

(परिच्छेद क्र.९८ )

# वाहन विभाग

**विषय:—** उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वाहन प्रतीपूर्ती योजना लागू केल्या बाबत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन—१०००/प्र.क्र.६५/२००१ विनिमय दि. १०/०९/२००१ शासन निर्णय दि. २५ मे, २००५, ३१/०७/२००८ अन्वये शासकीय कार्यालयामध्ये शासकीय वाहनांचे वापरा ऐवजी स्वत:चे खाजगी वाहन वापरण्यास परवानगी देवून त्यापोटी अधिकाऱ्यांना वाहन प्रतीपूर्ती योजना लागू करण्यात आली आहे. परंतू सदरची तरतूद ही केवळ शासकीय अधिकाऱ्यांनच लागू असतांना उल्हासनगर महानगरपालिकेत शासन निर्णयातील तरतूदीचे योग्य प्रकारे अवलोकन न करता दि. २८/०५/२००३ रोजी ठराव पारीत करून सदरची योजना मनपामधिल अधिकाऱ्यांना लागू केली आहे. मात्र सदरची योजना पदाधिकाऱ्यांना लागू करण्याबाबत सदरच्या ठरावात उल्लेख नसतांना २०११—१२ मध्ये सदरच्या योजनेचा लाभ मनपातील महापौर, उपमहापौर व सर्व सभापती यांना देण्यात आलेला आहे. सदरची योजना लागू करीत असतांना दि. २५ मे,२००५ चे शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय कामकांजाकरीता जे अधिकारी खाजगी वाहन वापर करण्याचा पर्याया स्विकारणार आहे अशा अधिकाऱ्याकरिता वाहन वापराचे दरमहा खर्चाचे प्रतिपूर्ती रक्कम निश्चित केली आहे. २०११—१२ मध्ये सदर योजने अंतर्गत महापालिकेतील पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वाहन खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ मंजूर केल्यामुळे मनपाचे लेखाशिर्ष अ—(९) इतर भत्ते व सवलती या योजने अंतर्गत खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | खर्चाची रक्कम रू. |
|---|---|---|
| ०१ | महानगरपालिका पदाधिकारी | १५,८६,०७७/– |
| ०२ | महानगरपालिका अधिकारी | १५,९१,०७९/– |
| एकुण खर्च | | ३१,७७,१५६/– |

१) सदरची योजना महापालिका पदाधिकारी यांना लागू करण्याबाबत शासन निर्णयात तरतूद नसतांना प्रत्यक्षात महापालिका पदाधिकाऱ्यांना लाभ मंजूर केल्यामुळे २०११–१२ मध्ये महापालिकेस रू. १५,८६,०७७/– आर्थिक भार सोसावा लागला तसेच दि. २९/२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये वाहन प्रतिपूर्ती १ एप्रिल २०१२ पासून पूर्णतः बंद केली असतांनाही सदर शासन निर्णयाचे अनुपालन न करता सदर योजनेचा लाभ अदयाप पर्यंत चालू ठेवलेला आहे. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १९–अ(१) नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने महानगरपालिकेस या कलमान्वये मानधन, फी किंवा अन्य भत्ते प्रत्येक महानगरपालिका सदस्याला देता येतील असे नमूद केले असतांना शासनांची पूर्व मंजूरी न घेता वाहन भत्ता दिला आहे.

२) दि. २५ मे, २००५ च्या वित्त विभागाचे शासन निर्णयान्वये सचिव दर्जाच्या खालील वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका–यांकरिता वाहनाची निश्चित किंमत, देखभाल दुरूस्ती, विमा इंधन व वाहनचालकाचा पगाार अशी डिझेल वाहनाकरिता रू.१४८७५/–व पेट्रोल वाहनाकरिता रू. १६३७५/– इतकी रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामधून रू.१०००/– सरसकट वजावट केल्यानंतर ही प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरेल अशी अट आहे. तथापि, महानगरपालिकेने महापौर यांना रू.२१०००/– उपमहापौर यांना रू२००००/– व स्थायी समिती सभापती यांना रू.२००००/– दरमहा प्रमाणे रक्कम अदा केली आहे. तसेच इतर पदाधिकारी व अधिकाऱ्यांना रू.१८,०००/– अदा केले आहे. तसेच सदरची योजना १ एप्रिल, २०१२ पासून शासनाने बंद केलेली असतांना पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे.

शासनाने दि. १/०४/२०१२ पासून वाहन भत्ता बंद केलेला असतांना मनपाने आपले अधिकाऱ्यांना सदर वाहन भत्ता चालू ठेवलेला आहे.

३) खालील कर्मचारी वर्ग –३ चे कार्यरत असतांना सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार महापालिकेतील अधिकाऱ्यांना सदर योजना लागू असतांना संबंधीत कर्मचाऱ्यांना २०११–१२ मध्ये खालील प्रमाणे रक्कम अदा केली आहे.

त्यामुळे सदरची रक्कम उपरोक्त कर्मचाऱ्यांकडून वसूल होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | प्रतिपूर्तीची रक्कम रू. |
|---|---|---|
| ०१ | श्री. भगवान य. कुमावत, व. लिपिक | १,०६,६९८/– |
| ०२ | श्री. एन. एस. समतानी, व. लिपिक | ४३,८४६/– |
| ०३ | श्री. किरण अ. शानबाग, सहा.अभियंता | ३०,७५०/– |
| | | १,८१,२९४/– |

याबाबत वाहन विभागाकडे विचारणा केली असता उक्त कर्मचाऱ्यांकडे प्रभाग अधिकारी या पदाचा कार्यभार असल्यामुळे त्यांना वाहन भत्ता देणे आवश्यक आहे. वाहन विभागाचे उत्तर स्विकारर्ह नाही, कारण अतिरिक्त कार्यभारामध्ये कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाच्या (मुळवेतन व ग्रेड पे) ५ टक्के इतके अतिरिक्त वेतन अनुज्ञेय असून इतर कोणतेही अतिरिक्त भत्ते देय होत नाही. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना दिलेली वाहन प्रतीपूर्तीची रक्कम रू. १८१,२९४/– वसूल पात्र आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.१९)

विषयः— ४० उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जाहिरात फलकाचे दर निश्चित करणे याकामाच्या उणीवाबाबत.

उल्हासनगर महापालिकेने शहराचे दोन भागात म्हणजे कॅम्प नं. १,२व३ आणि कॅम्प नं. ४व५ मध्यें होर्डीग, खांब व फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्द करणेकामी वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. अंतिम दिनांकापर्यत कॅम्प नं. १,२व३ साठी तसेच ४व५ प्रत्येकी ५ निविदाधारकांनी निविदा भरल्यानंतर ३ पात्र निविदाकारांमधून १,२व३ साठी मे. लक्ष्मी ॲडव्हर्टाइझिंग एजन्सी, उल्हासनगर व कॅम्प नं. ४व५ साठी मे.किंग्ज एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ यांना कार्यादेश देण्यांत आलेला होता. मे.लक्ष्मी ॲड यांच्या कराराची मुदत दि. ०६.१०.२०१० तर मे.किंग्ज एंटरप्रायजेस यांच्या कराराची मुदत दि. ११.०७.२०१० रोजी संपल्यामुळें दोघांना पुढील ३ वर्षासाठी प्रती वर्षी मागील दराच्या १० टक्के वाढीव दराने मुदतवाढ देण्यांत आलेला आहे. या संदर्भात मालमता विभागाने उपलब्ध करून दिलेल्या उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीतील जाहिरातील फलकाचे दर निश्चित करणेबाबच्या प्राप्त नस्तीचे लेखापरीक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जाहिरातील फलकाचे दर निश्चितीबाबत. कॅम्प नंबर १,२,३ व ४ आणि ५ साठी. |
| निविदा सुचना | : | जा.क्र.उमपा/करवी/२५/६१४ of ७, दिनांक २३.०३.२००७ |
| तंत्रिक मान्यता | : | आढळून आली नाही. |
| प्रशासकिय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्रमांक २२, दि. १८.०५.२००७ मुदतवाढ—१३६, दि. ३१.०३.२०१० |
| कार्यारंभ आदेश क्रमांक | : | १,२ व ३ साठी — उमपा/करविभाग/७४६ of ७,दि. २३.०८.२००७ आणि कॅम्प ४व५ साठी उमपा/करविभाग/७४७ of ७,दि. ३१.०५.२००७ |
| काम पुर्ण केल्याचा दिनांक | : | कार्यादेशामध्ये कालावधी नमुद करण्यांत आलेला नाही. |
| वर्तमान पत्राचे नाव | : | दै.जनादेश(क वर्ग), दै.खबरे आज तक(ब वर्ग हिंदी क) दि. २८.०३.२००७ (कात्रणे आढळून आली नाही.) |
| निविदा कालावधी | : | दि.०२.०४.२००७ ते दि. ०५.०४.२००७ |
| निविदा शुल्क | : | रू. २५०० |
| अनामत रक्कम | : | रू. २५०० |
| मुद्रांक शुल्क | : | आढळून आले नाही. |
| सेवा शुल्क | : | घेण्यांत आलेले आढळून आले नाही. |

१) या निविदेबाबतची संपूर्ण नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यांत आलेली नाही. त्यामुळे या निविदेमध्ये तांत्रिक बाबी काय होत्या, जाहिरातीचे निकष, दर निश्चिती व

इतर आवश्यक बाबींची तपासणी करणे शक्य झाले नाही. त्याच बरोबर या निविदेतील २ निविदाकार मे. डॉट डिझाईन, डोंबिवली व मे. लिओ मिडीया मार्केटिंग, प्रा.लि.डोंबिवली यांना तांत्रिकबाबी पूर्ण न केल्यामुळे अपात्र करण्यांत आल्याचे नमुद आहे. सदर निविदाकारांना कोणत्या तांत्रिक कारणासाठी अपात्र करण्यांत आले याबाबतची कारणे व दस्ताऐवज अप्राप्त असल्यामुळे मे.डॉट व मे.लिओ यांच्या अपात्रतेची तपासणी करणे शक्य झाले नाही.

२) उपरोक्त निविदेसाठी शा.नि. दि.०२.०१.९२ मधील ८०.३(ब) नुसार निविदा कालावधी किमान ३ आठवडे आवश्यक असतांना कालावधी हा दि. ०२.०४.२००७ ते दि. ०५.०४.२००७ असा अल्पावधीचा देण्यांत आलेला आहे. यामुळे या शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असून हा कालावधी कमी असल्यामुळे पुरेशी स्पर्धा न झाल्याचे दिसून येते.

३) आवश्यक निविदा शुल्काची रक्कम व अनामत रक्कम कशाच्या आधारावर निश्चित करण्यांत आली याबाबत साधार स्पष्टता झालेली नाही.

४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात क्रमांक २०९/प्र.क्र.१३७/का—३४, दिनांक

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. २०)

## विषयः— भाडयाने दिलेल्या समाज मंदिराच्या थकित भाडयाबाबत

उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे गुरूनानक शाळेजवळील विकास मतीमंद विदयालय, उल्हा–४ येथिल कुर्ला कॅम्प ही मालमत्ता भाडयाने देण्यात आलेली आहे. सदर मालमत्ता स्थायी समिती ठराव क्र.१०३, दि. १०/१२/२००७ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने रू. ४५,९६०/– प्रती वर्ष इतके भाडे निश्चित केलेले आहे. त्यानुसार उपायुक्त(मालमता)यांचे पत्र क्र. उमपा/मालमत्ता/६१४/०७ दि. ६/०४/२००७ अन्वये ११ महिन्यासाठी भाडयाने दिलेले आहे. या संचिकेची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

जागेचे ठिकाण — गुरूनानक शाळेजवळील समाजमंदीर उल्हासनगर–४

१) विकास मतीमंद विदयालय, उल्हा–४ या मालमत्तेचे क्षेत्र व मुल्य किती आहे? ही मालमत्ता भाडयाने देताना कोणत्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला तसेच ही मालमत्ता भाडयाने देताना या जागेच्या भाडयाचे मुल्य किती होते? याबाबतची परिगणना शिघ्रगणक प्रपत्रानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याकडून परिगणना करण्यात आली होती. किंवा कसे याबाबतची माहिती प्राप्त संचिकेत आढळून आलेली नाही. त्यामुळे उक्त मालमत्ते बाबतच्या भाडयाच्या वसूलीबाबत संपूर्ण लेखापरिक्षण करणे शक्य झाले नाही.

२) सदर मालमत्ता ११ महिने भाडयाने देण्याचा करार नाम्यामध्ये कालावधी नमूद करण्यात आलेला नसून साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

३) अट क्र.९ नुसार उपरोक्त संस्थेने पाणीबील व अनुक्रमांक १४ नुसार विजबिल भरणे बंधनकारक असल्याने सदर संस्थेने पाणी व विज भरल्याचे दस्ताऐवज लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही.

४) या मालमत्तेचे उक्त संस्थेने माहे डिसेंबर २००७ चे मासिक भाडे रू. ३,८३०/– अदा केलेले आहे. स्थायी समिती ठराव क्र. २० दि. २०/०६/२०१० नुसार वरील संस्थेस १५ वर्षासाठी नाममात्र रू. ५००/– प्रती महा भाडे करण्याबाबत ठराव संमत करण्यात आलेला आहे. या संस्थेस स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि.१०/१२/००७ पासून ११ महिन्यानंतर हा करार नामा संपुष्टात आणून लिलाव पध्दतीने भाडे करार करणे उचित ठरले असते. परंतू असे न करता स्थायी समिती ठराव क्र. २० दि. २०/०६/२०१० अन्वये नाममात्र भाडयाने केलेला ठराव हा महानगरपालिका हिताचा केलेला नसल्याचे दिसून येते. सदर संस्थेकडून रू. ३,८३०/– प्रतीमहिना वसूली करून महापालिका फंडात जमा करावी व मालमत्तेच्या लिलावाव्दारे भाडे ठरवून भाडयाचा करारनामा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या भाडयाच्या रकमेवर सेवा कर

आकारण्यात आलेला नाही. डिसेंबर, २००७ पासून मार्च २०१२ पर्यंत आकारणी होत असलेल्या एकुण भाडयावर १०.३०% प्रमाणे हा कर आकारून खालील प्रमाणे रू.१९,२६५/— महापालिका फंडात जमा करावेत.

| वर्ष | भाडयाची रक्कम वार्षिक | अनुज्ञेय सेवाकर वार्षिक भाडयावर १०.३०% |
|---|---|---|
| डिसेंबर—०७ | ३८३० | =३८३०X१०.३०%/१२X १ =३३रू. |
| २००८—२०११ | ४५९६० X ४ = १८३८४० | =१८३८४०X१०.३०%=१८९३६ रू |
| मार्च,२०१२ पर्यंत | ३८३०X३ = ११४९० | =११४९०X१०.३०%/१२X३=२९६रू |
| | एकुण वसूलपात्र सेवाकर | = रू. १९२६५ /— |

निविदा शुल्क रू.१०० वसूल करण्यात आलेले नसल्यामुळे रू.१०० वसूल करण्यात यावे.

उपायुक्त(मालमत्ता) यांचे पत्र क्र.उमपा मालमत्ता ६१४/०७, दि. ०६/०४/२००७ नुसार प्रस्तावित भाडे वसुली.

| कालावधी | भाडे रू. |
|---|---|
| जनेवारी०८ ते मार्च १२ | ३८३० X ५१= १९५३३० |
| व्याज(करारनाम्यातील अक्र२ नुसार) | १८% X १९५३३०= ३५१५९ |
| सेवा कर१०.३०% | १९२६५ |
| मुद्रांक शुल्क | १०० |
| वसूलपात्र रक्कम रूपये | रू. २४९८५४ |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.२१)

विषय:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी मालमत्तेवर जाहिरात लावणेबाबत अनियमितता.

उल्हासनगर शहरातील खाजगी मिळकतींवर जाहिरात लावणे संदर्भात खाजगी मिळकतीवर मे. पुजा ॲड उल्हासनगर यांनी खालील प्रमाणे जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) जाहिरातदाराचे नाव : मे. पुजा ॲडव्हटायझिंग एजन्सी. उल्हासनगर

जागेचे ठिकाण : शॉप नं. ७३६ च्या वर कल्याण अंबरनाथ रोड तिलसन शॉपिंग सेंटर, उल्हासनगर ३

कालावधी : दि. १/०९/२०११ ते ३१/०८/२०१२

क्षेत्र : ३०X२०=६०० चौ.फूट = ५५.७४ चौ.मी.

दर : दि. ०६/१०/२०११ पर्यत २.७५ प्रति चौ.मी. प्रतिदिवस

दि. ०७/१०/२०११ ते ३१/८/२०१२ रू. ३.०३ प्रति चौ.मी. प्रति दिन

i) भरलेली रक्कम : रू. ५६०२० पावती क्र. ३०३७३४/१९/९/२०११

भरावयाची रक्कम....

दि. ०१/०९/२०११ ते दि. ०६/१०/२०११=३६(दिवस) X ५५.७४(क्षेत्र) X २.७५(दर)=५५१८.२६

दि. ०७/१०/२०११ ते दि. ३१/०८/२०१२= ३२९ X ५५.७४X ३.०३=५५५६५.५३

एकूण ५५१८.२६+५५५६५.५३=६१०८४

एकूण कमी भरलेली रक्कम = प्रत्येक्ष गणना रक्कम—प्रत्यक्ष भरलेली रक्कम = ६१०८४—५६०२०

= ५०६४.

ii) उपरोक्त परवानगी धारक मे. पुजा ॲडव्हटायझिंग एजन्सी. उल्हासनगर यांना परवानगी दिलेल्या नस्तीमध्ये केवळ मे. पुजा ॲड उल्हासनगर यांचा केवळ विनंती अर्ज प्राप्त झाला असून इतर दस्तऐवज जसे की मंजूरी आदेश, अटि शर्ती, संबंधीत अधिकारी कर्मचारी यांचा प्रत्यक्ष दर्शनी अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे पूर्ण लेखा परिक्षण करणे शक्य झाले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक

उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा विभाग

(परिच्छेद क्र.२८)

**विषय:—** उल्हासनगर महानगरपालिकेने द्विनोंद पध्दतीत लेखे ठेवलेले नाहीत.

उल्हासनगर मनपाच्या लेखा विभागातील रोखवही व इतर तत्सक लेख्यांची तपासणी केली असता उपलब्ध लेख्यांसंदर्भात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

शासन निर्णय नगरविकास विभाग, मंत्रालय, क्र.लेखास— १०२००/प्र.क्र. ५/नवि—३१ दि. ०६/०७/२००५ नुसार महानगरपालिकेने दि. ०१/०४/२००५ पासून लेखे द्विनोंद पध्दतीने ठेवण्याबाबत आदेशित केले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. १९ दि. २३/१०/२०१३ नुसार राष्ट्रीय लेखा संहिता (NMAM) मधिल नमुन्यातील उपर्जित व दुहेरी नोंद पध्दतीने ताळेबंद, जमा, व खर्च इत्यादी वार्षिक वित्तिय लेख्यांची मागणी केली असता त्याप्रमाणे लेखा लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे त्यावरील अभिप्राय नमूद करता आले नाही.

मनपा निधीची रोख वही तसेच इतर रोख वहया एकेरी नोंद पध्दतीने ठेवल्याचे दिसून आले आहे. नागरी प्रशासनास सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थाना आर्थिक दृष्टया सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पतसुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे. त्यातिल अनिवार्य सुधारणांमध्ये महापालिकांनी आधुनिक द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवणे ही बाब अंतर्भुत आहे. परंतू उल्हासनगर महानगरपालिकेने द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवलेले दिसून आले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा विभाग

(परिच्छेद १.२३)

विषय :— सन २०११—१२ चे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता स्टेशनरी खरेदी मधील अनियमिततेबाबत

लेखा विभागाने दिनांक १४.०२.२०११ रोजी टिप्पणी प्रस्तावित करून २०११—१२ चे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील प्रमाणे स्टेशनरी खरेदी केली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ४५७/अ/ १७.०२.११ | ४७८/— निरंक | निलराज फॅन्सी स्टोअर्स | Budget folder<br>Conference pad<br>Ball pen Ball pen | 150 No<br>150 No<br>150 No<br>24 No | 37500<br>825<br>1425<br>1416 |
| | | | | | 41166 |

१) सदरची स्टेशनरी खरेदी करण्यापूर्वी भांडारात स्टेशनरी उपलब्ध असल्याची खात्री करण्यातसाठी भांडार विभागास वरील स्टेशनरी मागणी पत्रक नास्तीसोबत आढळून नाही. भांडार विभागाकडून स्टेशनरी उपलब्ध नसल्याचे व खरेदी करण्यास हरकत नसल्याचे पत्र न घेता लेखा विभागाने परस्पर खरेदी केली आहे.

२) दरपत्रकावर मुख्य लेखा अधिकारी यांनी स्वाक्षरी केली आहे, तथापी दरपत्रके केंव्हा प्राप्त झाली याबाबतचा दिनांक नमुद केला नाही. तसेच सदर दरपत्रकाची आवक नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आली नाही.

३) वरील बिलांव्दारे छपाई करून घेतलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील Dilivery Challan व साठानोंदवहीत घेतल्याची नोंद नाही. त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही. तसेचे सदरहू साहित्याचे वितरण केल्याबाबतची नोंद घेण्यात आली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा विभाग

(परिच्छेद क्र.२४)

लेखा विभागाने

विषय:—उल्हासनगर महानगरपालिकेने सुरक्षा अनामत नोंद वहि लेखापरिक्षण पथकात लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. सबब, २०११—१२ या वित्तिय वर्षाच्या सुरवातीची शिल्लक, सदर वर्षामध्ये प्राप्त झालेली रक्कम व ३१ मार्च, २०१२ अखेर शिल्लक असलेल्या रकमेचे लेखा परिक्षण करता आले नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे २०११—१२ या वित्तिय वर्षामध्ये सुरक्षा अनामत रकमेच्या लेखापरिक्षणाकरीता खालील प्रमाणे माहिती व अभिलेख उपलब्ध करून दिलेले नसल्याने अनामत रकमे संबंधी लेखापरिक्षण करता आले नाही.

१) सुरक्षा अनामत नोंदवहि

२) दि. ३१/०३/२०११ अखेर सुरक्षा अनामत रक्कम व त्यांच्या कालावधीबाबत तपशीलवार माहिती.

३) २०११—१२ मध्ये प्राप्त सुरक्षा अनामत रकमेची तपशीलवार माहिती.

४) सुरक्षा अनामत रकमेच्या अनुषंगाने ठेवण्यात आलेले अभिलेख.

लेखा विभागाने २०११—१२ या वित्तिय वर्षामधिल सुरक्षा अनामत रकमेबाबत फक्त संगणकिय प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये २०१११—१२ मध्ये प्राप्त सुरक्षा अनामत रकमेची माहिती देण्यात आली होती. परंतु उपरोक्त अनु. १,२ बाबत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे सुरक्षा अनामत रकमेबाबत लेखापरिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक आरोग्य विभाग

(परिच्छेद क्र.२५)

विषयः— आरोग्य विभागाकडील एड्स,टि.बी.व इतर रोग प्रतिबंधक खर्च या कामावरील खर्चातील अनियमितता

उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाकडील C—२(V) एड्स, टि.बी. व इतर रोग प्रतिबंधक खर्च लेखाशिर्षाखालील खर्चाचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

| अ.क्र | डी.व्ही.क्र.व दिनांक | कामाचे नाव | खर्च रूपये |
|---|---|---|---|
| ०१ | ३०१८/२८.९.२०११ | दुषित पाण्याच्या छपाई पॅम्पलेट खर्च | ३०,०००/— |
| | | चिकन गुनीया व डेंगु पासून जनतेला अवहान | ३०,०००/— |
| ०२ | २७२०/१२.०९.२०११ | चालीया उत्सवा करीता बॅर्नस बनविणेबाबत | ४५,०००/— |
| | एकुण | | १,०५,०००/— |

१) उपरोक्त खर्चाच्या नस्ती तपासली असता सदर खरेदी दरपत्रकानुसार केल्याचे नस्तीमधील टिपणीत नमुद आहे. या देयकात नमूद दर कसे घेण्यात आले या पृष्ठार्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही. तसेच याबाबतची नोंदवही मागणीपत्र खरेदी प्रक्रिया यासारखे आवश्यक दस्ताऐवज उपलब्ध करून देण्यात आले नाही.

२) उपरोक्त खर्च केवळ छपाईसाठीच झाल्याचे निर्दशनास येते. सदर खर्चाची एकुण रक्कम रू. ५०,०००/— च्या वर असल्यामुळे या खर्चाच्या बाबी करीता शासन नि.क्र.भाखंस—१०८६(२५१२)/उदयोग—६ दि.०२.०१.१९९२ नुसार मागविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

३) २०११–१२ या य वित्तीय वर्षात एकुण छपाईसाठी किती खर्च झाला याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही.

वरील मुदयांच्या अनुषंगाने या खर्चाची आवश्यक ती माहिती अप्राप्त असल्यामुळे यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन असल्याचे लखापरीक्षणांती निदर्शनास येते.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.२६)

# सार्वजनिक आरोग्य विभाग ( वैद्यकिय )

**विषय :— डंपींग ग्राउंड येथील कचऱ्याचे सपाटीकरण करणे याकामातील अनियमितता**

डंपींग ग्राउंड येथील कचऱ्याचे सपाटीकरण करणे या कामासाठी दि. १/७/२०११ रोजी दै.फ्रि प्रेस जर्नल, दै.धनुष्यधारी व दै.सागर या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निवदा प्रक्रिया व खर्चाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे अभिप्राय देत आहोत.

उपरोक्त खर्चाच्या नस्ती तपासले असता या नस्तीमध्ये अग्रीम देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची मागणी लसीकरण मोहिमेत आदेशीत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश, मानधन अदा करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षीय कर्मचारी/ अधिकारी यांच्या अहवालसह हजेरी पत्र तसेच पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेंतर्गत अग्रीम वाटप करण्यांत आलेल्या कर्मचाऱ्यांना सदर अग्रीमाचे दर व अग्रीम कशाच्या आधारे निश्चित करण्यात आले या पृष्ठयार्थ कोणतेही दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

सदर अग्रिम देय मानधनामधून वसुल करण्यात आले किंवा नाही याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

कर्मचाऱ्यांची मागणी, त्यांचे नियुक्ती आदेश, हजेरी पत्रक अग्रीमाचे दर याबाबतची माहिती अप्राप्त असल्यामळे यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम अक्षेपाधिन असल्याचे लेखापरिक्षण करतांना निर्दशनास आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र२७)

# सार्वजनिक आरोग्य विभाग

**विषय :— सार्वजनिक आरोग्य विभागातील किटकनाशके/ जंतूनाशके/दुर्गंधी नाशके/अळी नाशके/डास नाशके इत्यादींच्या खरेदीमधिल आढळलेल्या उणीवांबाबत**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागातील किटकनाशके/ जंतूनाशके/दुर्गंधी नाशके/अळी नाशके/डास नाशके इत्यादींच्या खरेदीबाबत दै.सकाळ, दै.नगरन्युज,व दै.प्रात:काल या दैनिक वृत्तपत्रात दिनांक १/७/२०११ रोजी जाहिरात प्रसारीत करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने पु.प्रमाणे निविदाकार होते. मे. डॉल्फिन सेल्स कल्याण, मे. मित्र हर्बल प्रा.लि.डोंबिवली, मे. न्युओ लॅब सोलापूर. मे.रविराज केमिकल्स डोंबिवली व मे. रॉयल इंटरप्रायजेस मुंबई यांनी वेगवेगळया बाबींसाठी दर भरलेले होते. या निविदाकारांमधून किमान दर धारकास वाटाघाटानंतर उभयतास मान्य असलेल्या दरांना स्थायी समिती ठराव क्र.६४, दि. ८/८/२०११ नुसार मान्यता देण्यात आल्यानंतर खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबत उपलब्ध करून दिलेल्या संचिकेच्या लेखापरिक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) प्राप्त संचिकेतील छायांकित प्रत पत्र क्र. उमपा/मुस्वानि/५४१/११ दि. ३१/१/२०११ अन्वये आवश्यक जंतूनाशके/किटकनाशके औषधे सफाईकामगारांसाठी शहरातील स्वच्छता/सफाईसाठी आवश्यक साहित्य पुरवठा होणेबाबत स्वच्छता निरिक्षकांना प्रभागा निहाय स्वतंत्र मागणी न करता एकत्र मागणी केलेली आढळून येते. सदर मागणी विभागावार आवश्यकते नुसार तसेच शिल्लक असलेल्या साठयाच्या प्रमाणात आवश्यक असतांना त्याप्रमाणात करून आलेली आढळून आली नाही.

क्षेत्र निहाय वापर, त्याची आवश्यकता, वापराचे परिमाण व प्रमाण त्याचप्रमाणे या खरेदी संदर्भातील मागिल वापर नोंदवही, कमाल व किमान साठा पातळी त्याची मार्गदर्शक तत्वे याबाबतची माहिती लेखापरिक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

२) प्राप्त नस्तीमध्ये तांत्रिक मंजूरी आढळून आलेली नाही. तसेच या अंदाजपत्रकातील निश्चत केलेली रक्कम रू. ७,५०,०००/— कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आली या पृष्ठयर्थ आवश्यक दस्ताऐवज लेखापरिक्षणास आढळून आलेले नाही.

३) शासन परिपत्रक क्र. सीएटी ०९/सीआर १६/इमारत २ दि. १५/५/२००१ नुसार रू. ७,५०,०००/— रकमेसाठी आवश्यक

(परिच्छेद क्र.२७)

# सार्वजनिक आरोग्य विभाग

**विषय :-** **सार्वजनिक आरोग्य विभागातील किटकनाशके/ जंतूनाशके/दुर्गंधी नाशके/अळी नाशके/डास नाशके इत्यादींच्या खरेदीमधिल आढळलेल्या उणीवांबाबत**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागातील किटकनाशके/ जंतूनाशके/दुर्गंधी नाशके/अळी नाशके/डास नाशके इत्यादींच्या खरेदीबाबत दै.सकाळ, दै.नगरन्युज,व दै.प्रात:काल या दैनिक वृत्तपत्रात दिनांक १/७/२०११ रोजी जाहिरात प्रसारीत करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने पु.प्रमाणे निविदाकार होते. मे. डॉल्फिन सेल्स कल्याण, मे. मित्र हर्बल प्रा.लि.डोंबिवली, मे. न्युओ लॅब सोलापूर. मे.रविराज केमिकल्स डोंबिवली व मे. रॉयल इंटरप्रायजेस मुंबई यांनी वेगवेगळया बाबींसाठी दर भरलेले होते. या निविदाकारांमधून किमान दर धारकास वाटाघाटानंतर उभयतास मान्य असलेल्या दरांना स्थायी समिती ठराव क्र.६४, दि. ८/८/२०११ नुसार मान्यता देण्यात आल्यानंतर खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबत उपलब्ध करून दिलेल्या संचिकेच्या लेखापरिक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) प्राप्त संचिकेतील छायांकित प्रत पत्र क्र. उमपा/मुस्वानि/५४१/११ दि. ३१/१/२०११ अन्वये आवश्यक जंतूनाशके/किटकनाशके औषधे सफाईकामगारांसाठी शहरातील स्वच्छता/सफाईसाठी आवश्यक साहित्य पुरवठा होणेबाबत स्वच्छता निरिक्षकांना प्रभागा निहाय स्वतंत्र मागणी न करता एकत्र मागणी केलेली आढळून येते. सदर मागणी विभागावार आवश्यकते नुसार तसेच शिल्लक असलेल्या साठयाच्या प्रमाणात आवश्यक असतांना त्याप्रमाणात करून आलेली आढळून आली नाही.
क्षेत्र निहाय वापर, त्याची आवश्यकता, वापराचे परिमाण व प्रमाण त्याचप्रमाणे या खरेदी संदर्भातील मागिल वापर नोंदवही, कमाल व किमान साठा पातळी त्याची मार्गदर्शक तत्वे याबाबतची माहिती लेखापरिक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

२) प्राप्त नस्तीमध्ये तांत्रिक मंजूरी आढळून आलेली नाही. तसेच या अंदाजपत्रकातील निश्चत केलेली रक्कम रू. ७,५०,०००/— कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आली या पृष्ठयर्थ आवश्यक दस्ताऐवज लेखापरिक्षणास आढळून आलेले नाही.

३) शासन परिपत्रक क्र. सीएटी ०९/सीआर १६/इमारत २ दि. १५/५/२००१ नुसार रू. ७,५०,०००/— रकमेसाठी आवश्यक

आकारण्यात आले आहे. उर्वरित रू.२००० X ५= १०,०००/— वसूल करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# अनधिकृत बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र. २८)

विषय:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील अधिकृतबांधकामाबाबत.

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारती व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते. महाराष्ट्र शासनाने सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक—२ दिनांक ४/१/२००८ रोजीचे राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम २६७ अ समाविष्ट केले आहे. या कलमात अवैध बांधकामांना शास्तीच्या रक्कमेची आकरणी करणे बाबत तरतुद करण्यात आलेली आहे. सदरचा अधिनियम हा दि. ४/१/२००८ पासून अमलात आला असल्याने त्या तारखेनंतर जे अवैध बांधकाम व पुर्नबांधकाम केले जाईल. त्याच्या बाबतीत सदर शास्तीची तरतूद लागू होईल असे कळविलेले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील अनाधिकृत बांधकामाबाबतची तपशिलवार माहिती,संचिका लेखापरिक्षणासाठी केली असता कर विभागाने त्याचे कडिल दि. ७/२/२०१४ च्या पत्रान्वये शहरात ज्या इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करण्यात आलेले आहे. किंवा पुर्नबांधकाम करण्यात आलेले आहे. अशा मालमत्तांची अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत प्राप्त माहितीच्या आधारे सदर मिळकतीवर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लागु करण्या संबधी कार्यवाही सुरू असल्याचे कळविले आहे. तथापी अवैध बांधकामाची तपशीलवार माहिती, संचिका उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे सन २०११—१२ मधील महानगरपालिकेच्या हद्दीतील किती बांधकामे अवैध आहेत व सदर बांधकामांवर कराच्या शास्तीची आकारणी केली आहे. याबाबत लेखा परिक्षण करता आले नाही.

शहरामध्ये २०११—१२ अखेर एकूण १२३८६५ निवासी व ३५७१८ अनिवासी तसेच २७४ संकिर्ण बांधकामे असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. त्यापैकी अवैध बांधकामांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम २६७ अ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

(स्वाक्षरी)

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.२९)

# कर विभाग

**विषय :—उल्हासनगर महानगरपालिकेने कर आकारणी नोंद वही लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्यामुळे महापालिकेच्या हद्दीतील एकुण मालमत्ता व त्याचे करयोग्य मुल्य तसेच वसूल केलेला कर याबाबतचे लेखा परिक्षण करता आले नाही.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८, नियम ९ नुसार महानगरपालिकेने स्थायी समितीच्या मान्यतेने विहित नमुन्यात मालमत्ता कराची आकरणी पुस्तके ठेवली पाहिजेत. सदर मालमत्ता पुसतकात खाली बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.

१) शहरातील सर्व इमारतींची व जमिनींची यादी

२) प्रत्येक इमारतींचे व जमिनींचे कर योग्य मुल्य

३) प्रत्येक इमारतीवर/जमिनीवर बसविणे योग्य असलेला मालमत्ता कर व कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव

४) अशी इमारत संपर्णतः किंवा तिच्या काही भागाकरीता सुट दिली असल्यास त्याबाबतची कारणे

५) कलम १३४,१३५ अन्वये कोणत्याही इमारतीस/जमिनीस पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार बसविण्यात आला असेल तर अशा पाणी पट्टीची रक्कम

कर आकारणी मागणी नोंदवहीत वरील माहिती समाविष्ट असणे आवश्यक आहे. सदर मागणी पुस्तके प्रभाग निहाय स्वतंत्र ठेवून सर्वांचे मिळून एक आकारणी पुस्तक ठेवण्यात यावे. नियम क्र.१४ नुसार सदरचे आकारणी पुस्तक जागेचा मालक, भोगवटादार किंवा भोगवटादाराच्या अभिकर्त्यास पाहण्यासाठी खुल ठेवणे आवश्यक आहे.

कर आकारणी पुस्तकाची मागणी केली असता आकारणी पुस्तक उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील एकुण मालमत्ता, त्याचे भोगवटादार व त्या मालमत्तेचे कर योग्य मुल्य वसूल केलेला कर इत्यादींचे लेखापरिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.३०)

# कर विभाग

**विषय:–उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरवरील कराच्या वसुलीबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरबाबत सर्वे झाला असल्यास एकूण मोबाईल टॉवर किती आहेत. त्याची तपशिलवार माहिती व मोबाईल टॉवर बाबतीत वसुल करण्यात आलेल्या कराची माहीती मागितली असता विभागाने त्यांचेकडील दि.७/२/२०१४ च्या पत्रान्वये एकुण ७६ मोबाईल टॉवरची माहिती दिली आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने २०११–२०१२ मध्ये रू. ५६२३६२२/– थकीत असल्याचे दिसुन येते.

सदर माहितीच्या अनुषंगाने लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेले खालील अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.

१) मोबाईल टॉवर कंपनी व जागा मालक यामध्ये झालेले नोंदणीकृत भाडेकरारनामा.

२) थकीत कराची रक्कम वसुलीबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली त्याबाबतचे पत्र व्यवहार, नोटीस इत्यादीची संचिका.

३)मोबाईल टॉवरची कर आकरणी करण्याच्या दृष्टीने संबंधीत निरिक्षकाचा स्थळपहाणी अहवाल व कर निर्धारण नस्ती, कराची दरपत्रके.

परंतु कर विभागाने उपरोक्त बाबत अनुपालन लेखापरिक्षणास सादर केले नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:टिपीएस–१८९०/१९७५/प्र.क्र.२४१७/१०/नवि–१३,दि.२६/७/२०११ अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात धोरणाबाबत नमुद आहे. महापालिकेच्या हद्दित मोबाईल टॉवर उभारणीकरीता नगर रचना विभागाच्या परवानगीची आवश्यकता आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाचे पत्र क्र.:उमपा/नरवि/सा / २७३/१३,दि.१४/२/२०१४ अन्वये कोणत्याही मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आली नसल्याने कळविलेले आहे. त्यामुळे सदर ७६ मोबाईल टॉवर हे अनधिकृत असल्याने त्यांचेकडून दंडात्मक रकमेसह थकीत कराची रक्कम रू.५६,२३,६२२/—रु वसूल पात्र आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# कर विभाग

(परिच्छेद क्र.३१)

विषय :– कर विभागाने ठेवलेल्या पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत.

उल्हासनगर महापालिकेतील कर विभागाने नमुना –१ मध्ये पावती पुस्तक नोंदवही ठेवली असुन त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहे

सन. २०११–२०१२ च्या पावती पुस्तक लेख्याची पडताळणी केली असता, भांडार विभागाने कर संकलन विभागास खालील प्रमाणे पावती पुस्तके वितरीत केली आहेत.

| अ.क्र | भांडार विभाग साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक व दिनांक | पावती पुस्तकांचा अनुक्रमांक | एकुण पावती पुस्तके | कर विभागास दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २६/३१.०१२०११ | २०१ ते ३०० | १०० | ३१.०१.२०११ |
| २ | २६/१४.०७.२०११ | ३०१ ते ३२५ | २५ | १४.०७.२०११ |
| ३ | २६/१४.१०.२०११ | ३२६ ते ३५० | २५ | १४.१०.२०११ |
| ४ | २६/०३.१२.२०११ | ३५१ ते ३७५ | २५ | ०३.१२.२०११ |
| ५ | २६/२७.१२.२०११ | ३७६ ते ४०० | २५ | २७.१२.२०११ |
| ६ | २६/०५.०१.२०१२ | ०१ ते २५ | २५ | ०५.०१.२०१२ |
| ७ | २६/०५.०१.२०१२ | २६ ते ५० | २५ | ०५.०१.२०१२ |

१) कर विाभागाने सदर पावती पुस्तकांचा हिशोब ठेवताना एकूण प्राप्त पावतीपुस्तकांची संख्या त्यांचेकडील नोंदवहीत नमुद केलेली नाही. त्यामुळे कोणत्या तारखेस किती पावती पुस्तके प्राप्त झाली याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच सदर नोंदवहीमध्ये कर संकलन अधिकारी यांची शिक्यानिशी स्वाक्षरी दिसुन येत नाही. त्यामुळे निरिक्षक/रोखपाल यांना दिलेली पावती पुस्तके व त्यांचेकडून वापर झाल्यानंतर परत घेण्यात आलेली पावतीपुस्तकांच्या स्थळप्रती यावर नियंत्रण असल्याचे दिसुन येत नाही.

२) भांडार विभागातुन पावती पुंस्तक क्रमांक २०१ ते ३०० दिनांक ३१.०१.२०११ रोजी घेतली असतांना कर विभागाने सदर पावती पुस्तकांचे वितरण दिनांक ३१.१२.२०१० पासुन केल्याचे नोंदवहीतुन दिसुन येते. त्यावरून भांडार विभागातुन पावती पुस्तके प्राप्त करण्यापूर्वीच सदर पावतीपुस्तकांचे वितरण कसे करण्यात आले, याबाब अर्थबोध होत नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.३२)

# कर विभाग

विषयः— उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागात मालमत्ता करापोटी भरण्यात आलेले धनादेश न वटल्याने रू. २,१४,६४,९०४/— वसूल पात्र असून सदर रक्कम वसूलीबाबत महानगरपालिकेने कार्यवाही केलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १२९ ते १३३ अ तसेच वेळोवेळी स्थायी समितीने दिल्यानुसार विहित दराने मालमत्ता धारकाकडून मालमत्ता कराची रक्कम वसूल केली जाते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाने मालमत्ता धारकाकडून रोख व धनादेश स्वरूपात मालमत्ता कराची रक्कम वसूल केली आहे. सन २०११— १२ चे लेखापरिक्षणात असे आढळून आले की, कर संकलन विभागाने रू. १३,५३,५८,९७४/— इतक्या रकमेचे धनादेश स्वीकृत केले होते. त्यापैकी रू. २,१४,६४,९०४/— इतक्या रकमेचे एकुण ३९६ धनादेश बॅकेतून (Dishonered cheque) अनादरीत झाले.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे संगणकीय प्रणाली विकसीत असल्यामुळे करापोटी न वटलेल्या धनादेशाचे रक्कम संबंधीताच्या खाती प्रलंबित दाखविण्याची तरतूद आहे.

न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल करण्यासाठी विभागाने कोणती कार्यवाही केली नसल्याचे निर्दशनास आले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक

उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद ३.33)

# कर विभाग

**विषय :— मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या नागरिकांकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ नुसार कराची वसुली केली जाते. महानगर पालिकाने केलेल्या कराची मागणी व वसुली तक्त्यानुसार सन २०११—१२ अखेर मागील थकबाकी रू. १०६,६८,९५,४७१/—, व चालु मागणी पैकी रू. ५१,९२,५०,५६१/— असुन एकूण रक्कम रू. १५८,६१,४६,०३२ थकीत असल्याचे निर्देशनास येते.

| सन | मागणीचे प्रकार | मागणी रूपये | वसुली रूपये | थकबाकी |
|---|---|---|---|---|
| २०११—१२ | थकबाकी | १३१३०२७९५२ | २४६१३२४८१ | १०६६८९५४७१ |
| | चालू मागणी | ७९७००५५७ | २७७७५४९९६ | ५१९२५०५६१ |
| | एकूण | २११००३३५०९ | ५२३८८७४७७ | १५८६१४६०३२ |

उपलब्ध कागदपत्राच्या आधारे तपासणी केली असता सन २०१०—२०११ ची थकीत रक्कम रू. १२८,५९,२०,३२२/— असताना सन २०११—२०१२ च्या सुरूवातीची शिल्लक रू. १३१,३०,२७,९५२/— दर्शविण्यात आले असुन रू. २७१,०७,६३०/— ची तफावत दिसून येते. थकित रकमा वसुल करणेकामी कर विभागाने योग्य ती कार्यवाही करीत नसल्याने महसुली उत्पनात घट निर्माण झाली आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# कर विभाग

(परिच्छेद क्र. ३४)

**विषय :-** कर आकारनी नोंदवही ठेवणे व अद्यावत करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४४ मधील प्रकरण — ८ नियम ९ नुसार महानगरपालिकेने स्थायी समितीच्या मान्यतेने विहित नमुन्यात मालमत्ता कराची आकारणी पुस्तके ठेवली पाहिजेत. सदर मालमत्ता पुस्तकात खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.

१) प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य.

२) अशी इमारत संपूर्णत: किंवा तिच्या काही भागांकरिता सुट दिली असल्यास त्याबाबतची कारणे.

३) शहरातील सर्व इमारतीची व जमिनींची यादी.

४) कलम १३४, १३५ अन्वये कोणत्याही इमारतीस/जमिनीस पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार बसविण्यात आला असेल तर अशा पाणीपट्टीची रक्कम.

५) प्रत्येक इमारतीवर/जमिनीवर बसविण्यायोग्य असलेला मालमत्ता कर व कर देण्यास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या व्यक्तिचे नाव.

कर आकारणी मागणी नोंदवही तपासली असता वरील माहिती समाविष्ट नसल्याचे निर्देशनास आले व मागणी पुस्तके प्रभागनिहाय ठेवण्यात आलेले नाही. तसेच कर विभागाने आकारणी पुस्तक ठेवलेले नाही. यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील एकूण मालमत्ता भोगवटदार व त्या मालमत्तेचे करयोग्य मुल्य आणि वसुल केलेला कर याबाबतची माहिती अद्यावत ठेवण्यात आलेली नाही.

त्यामुळे मालमत्तेचे करयोग्य मुल्य योग्य आहे किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र ३५)

# नागरिक सुविधा केंद्र

**विषय:— संगणक खरेदी मधिल अनियमितता**

उल्हासनगर महानगरपालिका अधिनस्त नागरिक सुविधा केंद्रामार्फत खालील कार्यदिशानुसार प्रत्येकी एक संगणक, एक प्रिंटर, व एक युपीएस अशा प्रमाणे ०३ संगणक, ०३ प्रिंटर, ०३ युपीएस स्थानिकरित्या दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आले

१) कार्यादेश क्र.: उमपा/नासुके/४७, दि. २५/५/२०१३

२) कार्यादेश क्र.: उमपा/नासुके/५९, दि. २७/५/२०१३

३) कार्यादेश क्र.: उमपा/नासुके/६०, दि. २७/५/२०१३

संगणक खरेदी बाबतच्या प्रदानाचा तपशिल खालील प्रमाणे

| संस्थेचे नाव | प्रमाणक क्र./दि. | धनादेश क्र. | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| मे. जयेश कॉम्प्युटर सर्व्हिस | २९३०/२१.९.२०११ | ८४७६१६ | १,३३,८१९/— |

संगणक प्रिंटर खरेदी बाबत राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दर करारपत्रक क्र.: DIT/file — १०/४०७६, दि. २४/१/२०११(वैधता दि. ३०/६/११पर्यंत) तसेच केंद्रशासनाचे दर करारपत्रक: computer/IT -1/RC-71090000/ 0511/81/01257/3429 दि. १९/१०/२०१०(वैधता दि. ३१/१०/११पर्यंत) उपलब्ध असतांना स्थानिक खरेदी करण्यात आलेली आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक

उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.३६)

# जनसंपर्क विभाग

**विषय** :– जनसंपर्क विभागातील खर्चाच्या अनुषंगाने आढळलेल्या उणीवांबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागाने केलेल्या जाहिरातीवरील खर्चाच्या देयकाचे लेखापरिक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) शा.नि.पीयुबी/प्र.क्र.७३/२०००/३४ दि. १/०५/२००१ मधिल क्र. ६ नुसार शासन मान्य दराचा अंगीकार करून शासन मान्य धोरणाप्रामाणे त्यात्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमलबजावणीची प्रक्रिया व नियमावली मा.महा संचालक, माहिती व जनसंपर्क यांचेकडून निश्चीत करून घेण्याचे निर्देश असतांना या अटींचे पालन झालेले आढळून आले नाही.

२) उपरोक्त निर्णयानुसार मा. महा संचालक, माहिती व जनसंपर्क यांचेकडून वाटपाच्या धोरणाच्या मंजूरी अभावी वृत्तपत्रात जाहिरात देतांना काय निकष लावण्यात आलेले आहे. त्याबाबतची संबंधित विभागाकडून साधार स्पष्टता न झाल्यामुळे वृत्तपत्र निवडीसाठी समान वाटप व वृत्तपत्र निवडीबाबत साशंकता वाटते.

३) निवडक वृत्तपत्रांच्या जाहिरांतींची देयके तपासली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. देयकासह जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्रावर paid & cancelled करून सदर देयक रद्द करण्यात आलेले नाही त्यामुळे सदर देयक दुबार वापरून अनेकदा प्रदान करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. संबंधित देयकांच्या चलनावर जाहिरातीचा मजकूर व आकार योग्य असल्याची तपासणी करून खातरजमा करण्यात आलेली आहे आशयाचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.

४) डी.व्ही क्र.४९२, दि. ३/५/२०११ या देयका संदर्भात

| प्रमाणक क्र | स्थूल र.रू | वजाती रू | निव्वळ र. रू | वर्तमान पत्राचे नाव | आकार व दर |
|---|---|---|---|---|---|
| ३४८/१५.३.११ | १४९७६० | १४९८ | १४८२६२ | दै.डी.एन.ए. | ८ X९ X२०८० |
| ३६८/२१.३.११ | १२४०० | १२४ | १२२७६ | दै. नवभारत | १६ X२५ X३१ |
| ३६९/२१.३.११ | ६८०००० | ६८०० | ६७३२०० | दै. लोकसत्ता | १६ X २५ X १७०० |
| ३७०/२१.३.११ | ८३२००० | ८३२० | ८२३६८० | दै.डी.एन.ए. | १६ X२५ X२०८० |
| एकुण | १६७४१६० | १६७४२ | १६५७४१८ | | |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# विदयुत विभाग

(परिच्छेद क्र.३७)

**विषयः— मनपाच्या अधिनस्त असलेली विदयुत जोडणीच्या विदयुत देयकामधील वीज शुल्लकाची रक्कम परत घेण्याबाबत.**

महानगरपालिकेतील विदयुत विभागाकडून एप्रिल ११ ते मार्च १२ कालावधीत ६,५९,८६७ इतकी रक्कम वीज शुल्का पोटी अदा केली आहे. मुबई वीज अधिनियम १९५६ च्या कलम ०२(क)(१)(क) नुसार शासकीय, निमशासकिय कार्यालयांना वीज शुल्क माफ असतांना विदयुत मंडळाकडुन वीजशुल्क माफ करून न घेता वीज बिलाचा भरणा केला आहे. त्यामुळे वीज शुल्कापोटी मनपाचा रू.६,५९,८६७/— इतका अतिरिक्त खर्च झाला आहे.

उल्हासनगर महापालिकेच्या अधिनस्त असलेल्या विदयुत जोडणीच्या विदयुत बिलात वीज शुल्क सुट व आजपर्यंत भरणा केलेली वीज शुल्काची रक्कम परत मिळणेबाबत अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे.

तरी याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. यांचेकडे पाठपुरावा करून रक्कम रू.६,५९,८६७/— वसूल करून मनपा निधित जमा करावी.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.३८)

# भांडार विभाग

विषय :— महापालीका दैनंदिनी छपाई व भांडार विभागास नियमित लागणारे छपाई साहित्याची खरेदी करतांना विहीत खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली आहे.

सदरचे निविदाव्दारे खालील प्रमाणे साहित्याची खरेदी केल्याचे दिसून येते.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | रक्कम (रू.) | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ७२/२०११ दि. १७/०६/११<br>३९३/२३.०३.२०११ | १८२/३१.०३.११<br>१८१/३१.०३.११ | मे. मोहीत एंटरप्रायझेस | २०३७००<br>५०००० | ३०९६/१.१०.११ |
| २८६/२०१० दि. १३.१२.१०<br>७०/२०११ दि. १७.२०११ | १०/—NIL-<br>१२/२१.०६.११ | श्रृती एंटरप्रायझेस<br>श्रृती एंटरप्रायझेस | १९२४५०<br>३५००० | २४०७/२.९.११<br>३९५७/३०.११.११ |
| २८७/२०१० दि. १३.१२.१० | | अमरज्योत एंटरप्रायझेस | २९८००० | |

वरील साहित्याची खरेदी नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळून आल्या आहेत

१. शासन निर्णय क्रं. भांखस. १०८८/(२५१२)/उदयोग—६, दि.२ जानेवारी १९९२ मधील परि.८.१ नुसार वस्तु खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करून खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी केली आह.

२. भांडारास नियमित लागणारे छपाई फॉर्म, व साहित्याची खरेदी करण्यासाठी एकत्रित निविदा मागविल्या असतांना मोहीत एंटरप्रायझेस यांचे कडील बिल क्रं.१८१/३१.०३.२०११ नुसार खरेदी केलेले जन्म मृत्यू दाखला फॉम एकूण किंमत रू. ५००००/— चे साहित्य दि.२५.०३.११ रोजी दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील नियम क्रमांक ८.३ नुसार रू. ५०००० किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता एकाच बाबीसाठी दोन वेळा दरपत्रके मागविण्यात येवून रू. ५००००/— चे साहित्याची छपाई केली आहे.

३. मोहीत एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर स्टेशनरी एलेक्ट्रीकल गुडस हार्डवेअर फर्निचर असे नमूद आहे. तसेच अमरज्योती एंटरप्रायझेस यांचे व्यवसायाचे नोंदणी दाखल्यावर व्यवसायाचे स्वरूप ऑफीस असे नमूद असतांना सदर निविदाधारकांची निविदा ग्राहय धरून दर निश्चिती करण्यात आली आहे. निविदा मागविताना इच्छूक पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात आल्या. वास्तविक पाहता छपाई साहित्याची निविदा प्रिटींग व्यवसाय परवाना धारकाकडून मागविणे आवश्यक होते. वरील पात्र

ठरविलेल्या निविदाधारकाकडे प्रिटींग व्यवसाय परवाना नसतांता सदरचे साहित्याच्या खरेदीसाठी तांत्रिक दृष्टया निविदा मंजुर करण्यात आली.

४. सदरील प्राप्त झालेले साहित्याचे वितरण करतांना संबंधीत विभागाकडून विभाग प्रमुखाचे सहीचे मागणीपत्र न घेता साहित्याचे वितरण केलेले साठानोंदवही वरून दिसून येते.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद ३.३९)

# भांडार विभाग

विषय :—महापालीका दैंनदिनी छपाई व भांडार विभागास नियमित लागणारे छपाई साहित्याची खरेदी करतांना विहीत खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली आहे.

सदरचे निविदाव्दारे खालील प्रमाणे साहित्याची खरेदी केल्याचे दिसून येते.

| पुरवठा आदेश कमांक व दिनांक | बिल कं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | रक्कम (रू.) | प्रमाणक कमांक |
|---|---|---|---|---|
| ७२/२०११ दि. १७/०६/११ ३९३/२३.०३.२०११ | १८२/३१.०३.११ १८१/३१.०३.११ | मे. मोहीत एंटरप्रायझेस | २०३७०० ५०००० | ३०९६/१.१०. ११ |
| २८६/२०१० दि.१३. १२.१० ७०/२०११ दि. १७.२०११ | १०/—NIL- १२/२१.०६.११ | श्रुती एंटरप्रायझेस<br>श्रुती एंटरप्रायझेस | १९२४५० ३५००० | २४०७/२.९.११ ३९५७/३०.११. ११ |
| २८७/२०१० दि. १३. १२.१० | | अमरज्योत एंटरप्रायझेस | २९८००० | |

वरील साहित्याची खरेदी नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळून आल्या आहेत

१. शासन निर्णय कं. भांखस. १०८८/(२५१२)/उदयोग—६, दि.२ जानेवारी १९९२ मधील परि.८.१ नुसार वस्तु खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करून खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी केली आह.

२. भांडारास नियमित लागणारे छमाई फॉर्म, व साहित्याची खरेदी करण्यासाठी एकत्रित निविदा मागविल्या असतांना मोहीत एंटरप्रायझेस यांचे कडील बिल कं.१८१/३१.०३.२०११ नुसार खरेदी केलेले जन्म मृत्यू दाखला फॉम एकूण किंमत रू. ५००००/— चे साहित्य दि.२५.०३.११ रोजी दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील नियम कमांक ८.३ नुसार रू. ५०००० किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता एकाच बाबीसाठी दोन वेळा दरपत्रके मागविण्यात येवून रू. ५००००/— चे साहित्याची छपाई केली आहे.

३. मोहीत एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर स्टेशनरी एलेक्ट्रीकल गुडस हार्डवेअर फर्निचर असे नमूद आहे. तसेच अमरज्योती एंटरप्रायझेस यांचे व्यवसायाचे नोंदणी दाखल्यावर व्यवसायाचे स्वरूप ऑफीस असे नमूद असतांना सदर निविदाधारकांची निविदा ग्राहय धरून दर निश्चिती करण्यात आली आहे. निविदा मागविताना इच्छूक पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात आल्या. वास्तविक पाहता छपाई साहित्याची निविदा प्रिटींग व्यवसाय परवाना धारकाकडून मागविणे आवश्यक होते. वरील पात्र ठरविलेल्या निविदाधारकाकडे प्रिटींग व्यवसाय परवाना नसतांता संदरचे साहित्याच्या खरेदीसाठी तांत्रिक दृष्टया निविदा मंजुर करण्यात आली.

४. सदरील प्राप्त झालेले साहित्याचे वितरण करतांना संबंधीत विभागाकडून विभाग प्रमुखाचे सहीने मागणीपत्र न घेता साहित्याचे वितरण केलेले साठानोंदवही वरून दिसून येते.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्येक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.७०)

# निवडणुक विभाग

विषय :— सार्वत्रिक निवडणुक २०१२ साठी साहित्याच्या खरेदी मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.प्रमाणक क्र. ५१२४ सार्वत्रिक निवडणुक २०१२ साठी महानगरपालिका येथिल निवडणुक विभागातून खालिल प्रमाणे साहित्याची खरेदी दर प्रत्रकाव्द्रारे केली आहे.

| पुरवठा आदेश व व दिनांक | बिल क्र. व दिनांक | पुरवठादाराचे नाव | खरेदी केलेल्या वस्तूचा तपशिल | परिताण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ३८४/११ दि. ०४/०२/२०१२ | | महेश इंटरप्रायझेस | झेरॉक्सपेपर, टोनर,, Plastic Folde Executive File दोन फोल्डर फाईल चार फोल्डर फाईल | ०३ नग<br>२० नग<br>१००नग<br>१००नग<br>१० नग<br>१००नग<br>१००नग | १४७००<br>४८००<br>९३००<br>११०००<br>३२५०<br>२४००<br>४००० |
| | | | | | ४९४५०० |
| ३८३/१२ दि. ४/०२/१२ | २०/०१/१२ | महेश इंटरप्रायझेस | अे—४ साईज पेपर झेरॉक्स पेपर कलर पेपर पंचमशीन इंकपॅड स्टेपलर मोठे गम बॉटल | ७५ नग<br>६० नग<br>५० नग<br>५० नग<br>५० नग<br>५० नग<br>५० नग | ११६६५<br>९४५०<br>५०००<br>४७५०<br>४२५०<br>४७५०<br>४५०० |
| | | | | | ४९७७५ |

वरील साहित्याची खरेदी नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

१. वरील साहित्याच्या खरेदीबाबतची दरपत्रके मागविण्यापुर्वी आयुक्तांची मंजुर घेणे आवश्यक असतांना अशी मंजुरी घेतल्याचे मंजुरी आदेश नस्ती सोबत आढळून आले नाहीत. लाल स्वास्तीक व महेश एंटरप्रायझेस यांचे दर पत्रकावर दिनांक नमुद नाही. तसेच यांचे दर पत्राकावर आवक क्र. व दिनांक नमुद नाही.

२ शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील नियम क्र. ८.३ नुसार रू. ५०,०००/— किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता निवडणूक कामासाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी

दोन वेळा दर पत्रके मागविण्यात येवून रू. ९९,२२५/— चे साहित्याची छपाई केली आहे. वरील वरील खरेदी एकाच दिनांकांचा पुरवठा आदेशानुसार करण्यात आल्याने खरेदी केलेल्या साहित्याची रक्कम रू. ५०,०००/— च्या वर असल्यामुळे निविदा मागावून खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना दोन स्वतंत्र आदेशामध्ये खरेदीची रक्कम विभागुन खरेदी करण्यात आली आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली १९६५ मधील नियम १७४ नुसार खरेदी प्रक्रीया टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

वरील बिलांद्वारे खरेदी केलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील Daliver Challan व साठा नोंदवहीत घेतल्याची नोंद नाही. त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणीप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच सदरहु साहित्याचे वितरण केलेल्याबाबतची नोंद देण्यात आली नाही. वरील अनियमितेबाबत विभागास पत्र क्र. १०२, दिनांक २०/१/२०१८ नुसार कळविले असता, विभागाने सादर केले नाही. तरी वरील बाबीवरील खर्चाची रक्कम रू. ९९,२२५/— आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावा.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.७१)

# जकात विभाग

**विषय:—मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. यांचे सोबत जकात ठेका करारनामा करतांना मुद्रांक शुल्काचे रक्कम रू.२५४२५४०/— कमी वसुल केल्यामुळे शासन महसूलाचे नुकसान झाले.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम ३५ अन्वये स्थायी समितीच्या मंजूरीने खाजगी अभिकर्ता नेमण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. त्यानुसार महासभा ठराव क्र.६९ दि. १०/२/२०११ अन्वये खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसूली करण्याचा ठराव पारित करण्यात आला आहे. २०१०—११ ची मान्य केलेली निविदा रक्कम रू. ११४, ६१, ४६,०७१ होती. त्यामध्ये १० टक्के नैसर्गिक वाढ रू.११, ४६ १४,६०७ करून २०११—१२ साठीची किमान देकार रक्कम रू. १२६, ०७ ,६०,६७८ निश्चित करण्यात आली.

त्यासाठी दै. लोकसत्ता, दै. नवभारत, डी.एन.ए. या वृत्तपत्रामध्ये जाहिर निविदा सुचना क्र.उमपा/पीआरओ/४०२/२०११ दि.११/३/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी दि. ११/३/२०११ ते २२/३/२०११ असा होता निविदा सादर करण्याचा शेवटचा दि. २४/३/२०११ असा होता निविदेच्या अखेरच्या दिनांकापर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. निविदा पाकिट क्र.(तांत्रिक लिफाफा) १ दि.२४/३/११ रोजी उघडले असता, २ निविदा पात्र ठरल्या. दि. २५/३/११ रोजी पात्र निविदांचे (दरपत्रकांचे पाकिट) क्र.२ उघडले. त्यामध्ये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. यांची देकार रकमेची बोली रू.१२७,१०,७०,०००/— ही सर्वाधिक व किमान देकार रकमेपेक्षा जास्त असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम ७३(क) नुसार आयुक्त, यांना निविदा करांची करार करण्यास मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात आला. स्थायी समितीने त्यास ठराव क्र.१४९ दि.२८/३/११ नुसार मान्यता दिली. महापालिकेने २९/३/११ रोजी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. यांचेशी करारनामा केला. कराराचा कालावधी १/४/११ ते ३१/३/१२ असा होता.

वरील जकात ठेका नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१ मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. यांचेशी जकात ठेक्याचा केलेला करारनामा रू.१०० च्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आला आहे. करार नाम्यातील रक्कम रू.१२७,१०,७०,०००/एवढी होती. करारनाम्यातील

रकमेवर मुद्रांक शुल्काची रक्कम निश्चित करण्याकरिता मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. यांनी मुद्रांक जिल्हा अधिकारी,ठाणे (ग्रामिण) यांचेकडे मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अंतर्गत कलम ३१ पोट नियम १ मधिल तरतूदीनुसार दि.८/४/२०११ रोजी अभिनिर्णया करीता अर्ज दाखल करून संलेखातील मुद्रांकाबाबत अभिनिर्णय मिळण्यासाठी विनंती केली. त्यावर मुद्रांक जिल्हा अधिकारी ठाणे(ग्रामिण)यांनी सदर दस्तास मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुसुची १ मधिल अनुच्छेद पाच(h) a iv नुसार करारमुल्य रक्कम रूपये १२७,१०,७०,०००/- यावर रू. २५,४२,१४० व ५४ (ii) नुसार गॅरंटी मुल्य रू.२०,१७,२१,७०८ या वर रू. ४०० व ४८ ड नुसार जकात वसुलीच्या अधिकाराबाबत रक्कम रू.१०० असे एकुण २५,४२,४२० इतकी रक्कम मुद्रांक शुल्कापोटी वसुल करून शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

(परिच्छेद क्र.४२)

# नगररचना विभाग

**विषय:—नगररचना विभागामार्फत वसूल करण्यात आलेल्या वृक्ष लागवड निधी बाबतची नोंदवही व अभिलेखे लेखापरिक्षणसाठी उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.**

नगररचना विभागाकडील आदेश क्र. ३५ दिनांक ३/२००० वृक्ष प्राधिकरणाचा दि. ७/११/१९९९ चा ठराव क्र. ६३ नुसार बांधकामाचे प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापूर्वी विहित दरानुसार अनामत ठेव घेवून वृक्ष निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. जागा मालकाने विहित संख्येप्रमाणे झाडांची लागवड केल्याबाबत महानगरपालिकेतील वृक्ष प्राधिकरणाची खात्री झाल्यानंतर सदरच्या ठेवीच्या रकमा परत केल्या जातात. अनामत ठेवीच्या रकमा परत मिळाण्यासाठी पुर्णत्वाचा दाखला दिल्यापासून जास्तीत जास्त दिड वर्षापर्यंत भोगवटादारास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. विहीत कालावधीत अर्जदाराकडून रक्कम परत मिळण्याबाबत अर्ज न आल्यास सदरच्या ठेवी जप्त करणे आवश्यक आहे. अशा ठेवी ठेवणे व परत करणे यासाठी स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे.

उल्हासनगर येथील वृक्ष लागवड ठेवीबाबतच्या अभिलेख्यांचे लेखापरिक्षण केले असता मनपाने वृक्ष निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमा व परत केलेल्या रकमांची स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही.

१) सन २०११—१२ मध्ये वसूल केलेल्या वृक्ष लागवड ठेवी व परत केलेल्या ठेवीच्या रकमा तसेच ठेवी बाबतची नोंद वही

२) तीन वर्षाच्या कालावधीत ठेवी परत मिळण्यासाठी अर्ज न केलेल्या ठेवीदारांच्या किती ठेवी जप्त केल्या व किती रक्कम जप्त केली या बाबतची माहिती.

३) जप्त न केलेल्या ठेवी बाबतची कारणे.

४) सदरच्या ठेवी ठेवण्यासाठी व परत करण्यासाठी विभागाने ठेवलेले ठेव खात्यांचे आदयावत केलेल्या पासबुकाची छायांकित प्रत.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका